।।श्री।।

# संक्षेप शारीरक भावदर्शन

## लेखकाचे मनोगत

भारतीय तत्त्वज्ञानाच्या प्रणालींमध्ये वेदान्तशास्त्राचे स्थान सर्वश्रेष्ठ आहे. त्या शास्त्राची भक्कम पायावर उभारणी करणारे बहुशः केवलाद्वैती शांकरमताचे पुरस्कर्ते आहेत. ब्रह्मसूत्राच्या शांकरभाष्याच्या आधाराने व अनुरोधाने अनेक महान शास्त्रवेत्त्यांनी ही उभारणी करून विचारमंथनाला सामग्री पुरविली आहे. अनेक सूक्ष्म बारकाव्यांचा विचार करता करता त्यांच्यात काही मतभेदही सहजच तयार झाले. उदा. जीव एक की अनेक हा एक मतभेदाचा मुद्दा आहे. भगवान शंकराचार्यांच्या चार प्रमुख शिष्यांपैकी श्रीसुरेश्वराचार्य ह्यांचे श्रीसर्वज्ञात्ममुनी हे एक शिष्य असून त्यांनी 'संक्षेप शारीरक' ही ब्रह्मसूत्रावरील शांकरभाष्याच्या पहिल्या चार सूत्रांवर अधिक स्पष्टीकरण करणारी टीका लिहिली आहे. ती श्लोकबद्ध असून तिचेही स्पष्टीकरण करणाऱ्या टीका लिहिल्या गेल्या आहेत. श्रीरामतीर्थस्वामी (अन्वयार्थ प्रकाशिका), श्रीनृसिंहआश्रम (तत्त्वबोधिनी), अग्निचित्पुरुषोत्तम (सुबोधिनी) इत्यादि टीका प्रसिद्ध असल्या तरी श्रीमधुसूदनसरस्वती ह्यांची 'सारसंग्रह' टीका संक्षेप शारीरकाला पुरेपूर न्याय देणारी आहे असे अनेक जाणकारांचे मत आहे. 'अद्वैतसिद्धी' सारखा महान ग्रंथ लिहून न्यायमताच्या दबदब्याचा फुगा फोडणारे महान विद्वान, असा त्यांचा लौकिक आहे. न्याय, मीमांसा व बौद्ध दर्शनांचा त्यांचा सूक्ष्म अभ्यास आहे. ह्या भाष्यामध्ये ह्या अभ्यासाच्या छटा दिसतात. मूळ संस्कृत मधील भाष्याचे श्री १००८ महामंडलेश्वर विद्यावाचस्पति स्वामी दिव्यानंदगिरिमहाराज ह्या महापंडितांनी हिन्दी भाषांतर केले असून ते उपलब्ध आहे.

श्रीसर्वज्ञात्ममुनींनी वेगवेगळ्या वृत्त व जातींच्या आधाराने ह्या ग्रंथाची श्लोकबद्ध रचना केल्याने वेदान्तशास्त्राला गेयतेचा अलंकार लाभला. ब्रह्मसूत्र शांकरभाष्याच्या पहिल्या चार सूत्रांवर बाराशे चाळीस श्लोकांची चार अध्यायात मांडणी केली आहे. '**अथातो ब्रह्मजिज्ञासा**', '**जन्माद्यस्य यतः**', '**शास्त्रयोनित्वात्**' व '**तत्तुसमन्वयात्**' ही ती पहिली चार सूत्रे आहेत. फार कमी शब्दात खूप आशय सांगणे हे सूत्राचे उद्दिष्ट आहे. तो आशय समजावून घेण्यासाठी उपनिषदे व गीतेचा परिपूर्ण अभ्यास असावा लागतो. सूत्रांच्या रचनेतच अर्थाबाबत मतभिन्नतेला बराच वाव आहे. द्वैत व अद्वैताच्या सर्व छटांमध्ये अशी मतभिन्नता स्पष्ट दिसते. श्रीसर्वज्ञात्ममुनी महान् पंडित असूनही त्यांची नम्रता व सद्गुरूवरील अविचल निष्ठा ते पुढील प्रमाणे व्यक्त करतात –

**गुरुचरणसरोजसन्निधानादपि वयमस्य गुणैकलेशभाजः।**
**अपि महति जलार्णवे निमग्नाः सलिलमुपाददते मितं हि मीनाः।।** (१-९)

अर्थ - श्रीगुरूंच्या चरणकमलांच्या आश्रयाने राहिल्याने माझ्यासारख्या शिष्यांना त्यांच्या माहात्म्याचा किंचित लेशच लाभला. कारण महासागरातील मासाही अगदी थोडे पाणी पितो व बाकीच्या पाण्याचा प्रचंड संचय त्याला लाभणे शक्य नसते.

संक्षेप शारीरकाच्या रचनेचे काही स्वरूप पाहिले असता पूर्ण ग्रंथाचे आकलन होणे सोपे होईल. स्वामी दिव्यानंदगिरी ह्यांनी सुंदर प्रास्ताविक केले आहे. श्रीमधुसूदनसरस्वतींच्या व अन्य टीकांच्या अनुरोधाने संक्षेप शारीरकाचा हा संक्षिप्त विचार आहे. एकूण ग्रंथाचे स्वरूप लक्षात येण्यास त्याची मदत होईल.

१) अद्वैतरूप ब्रह्माला भेदांनी भरलेल्या संसाराचा स्पर्शही नाही. जीव मात्र जन्ममरणरूप संसारात आकंठ बुडलेला आहे. त्यामुळे 'अहं ब्रह्मास्मि अशा महावाक्याने त्यांचे ऐक्य संभवत नाही' हा असंभावना दोष निर्माण होतो. ब्रह्म निरपेक्ष व्यापक असून जीव देहाएवढा असल्याने 'मी ब्रह्म नसून जीव आहे' अशी विपरीत भावना निर्माण होते. हे दोन्ही दोष जीवाच्या गैरसमजातून (भ्रम) निर्माण झाले असून त्यांचा ब्रह्माशी जराही संबंध नाही. म्हणजे दोष व्यक्तिनिष्ठ (प्रमातागत) असून वस्तुनिष्ठ (प्रमेयगत) नाहीत. शुद्ध ब्रह्म किंवा ज्ञानेंद्रिये ह्यांचा दोष नसून तो जीवात्म्याचा आहे. शुद्ध ब्रह्माला प्रमेयत्व केवळ अध्यारोपाने (समजुतीपुरते) येते. ते स्वसंवेद्य असल्याने प्रमेय नाही. डोळ्यांसारख्या ज्ञानेंद्रियांनी ते दृश्य किंवा ज्ञेय होत नसल्याने त्यांचाही दोष मानता येत नाही. ह्या संबंधी एक उदाहरण - एका राजाचा एक आवडता प्रधान होता. त्याचा मत्सर करणाऱ्यांनी प्रधानाला जंगलात नेऊन सोडले व 'तो मेला' असे सर्वांना सांगितले. एकदा राजा त्या जंगलात शिकारीला गेला असतांना त्याला तो प्रधान अचानक दिसला. पण बरोबर असलेल्या मत्सरी लोकांनी ते प्रधानाचे भूत असल्याचे राजाला सांगितले. राजाचाही त्यावर विश्वास बसला. हीच विपरीत भावना आहे(१.१४).

२) आत्म्यावर अज्ञानाचे आवरण असल्याने त्याचे ज्ञान होत नाही. अज्ञान व अन्तःकरण ह्यांचेही 'हे' असे भान होत नसल्याने अध्यास होणार नाही हे म्हणणे बरोबर नाही. आत्म्याचे भान सहजच सर्वांना आहे. चैतन्याच्या सामान्य (व्यापक) भागावर अज्ञानाचे आवरण नसून ते विशेष भागावर आहे (बुद्धिस्थ चैतन्य). केवळ समजुतीपुरतीच सामान्य व विशेष ह्या दोन भागांची कल्पना केली आहे. चैतन्याच्या आश्रयाने राहणारे अज्ञान त्या चैतन्यालाच विषय करते (माया-स्वविषया). उदा. अंधार घरात राहून 'अंधारमय घर' असा घराला विषय करतो. म्हणजे ते घर दिसू देत नाही. ह्या प्रकारे आत्म्याचा चित् अंश आच्छादित नसून आनंदांशावर आवरण आहे (पाहा - १-३१६ ते ३१९). ह्या विधानाचे स्पष्टीकरण त्यात आहे.

३) माणूस जी सुखाची साधने गोळा करतो, ती सर्व जीवात्म्याच्या सुखासाठी असतात. परंतु एकमेव आत्मा सुखरूप असल्याने तो कोणासाठी नाही व त्याच्यासाठी कोणी नाही. 'इतर इच्छा अनधीन इच्छा विषयत्वम् सुखत्वम्' अशी सुखाची व्याख्या आहे. कोणत्याही इच्छेच्या अधीन न होता केवळ आत्मसुखाचीच ज्यात इच्छा असते तेच वास्तविक सुखरूप आहे. आत्माच सुखरूप

आहे (१-२४). 'सर्वशेषित्वे सति अनन्यशेषि' असे विद्वान सुखाचे लक्षण करतात. हे लक्षण केवळ आत्म्यालाच लागू पडते. सर्व जाऊन उरतो तो आत्मा. पण आत्म्याहून वेगळे काहीच उरत नाही कारण आत्मभिन्न काही नाही.

४) आत्मबोध होऊनही अन्य विषयबोधाप्रमाणे तो बोध नसल्याने व्यवहारात अध्यास मानावा लागतो. ह्या आत्मस्वरूपात अहंकारादि दुःखांचा येणारा अनुभव अध्यस्त असल्याने तो वास्तविक नाही. आत्मा व अनात्मा ह्यांचा परस्परात अध्यास होतो. आत्म्याची नित्यता शरीरावर व शरीराचे मर्त्यत्व आत्म्यावर मानले जाते. हा अज्ञानाचा परिणाम आहे. जो हे अध्यासाचे वर्म पूर्णपणे जाणतो तो ह्या टीकेचा अधिकारी आहे (१-२७) (सारसंग्रह टीका).

५) अधिष्ठान व आधार ह्या शब्दांचे अर्थ वेगळे आहेत. ज्यावर मिथ्या सर्पादिकांचा अध्यास होतो त्या अधिष्ठानाच्या सामान्य अंशाला आधार म्हणावे आणि कार्यासह अज्ञान, आत्म्याच्या विशेष अज्ञानात अध्यस्त असल्याने त्याला अधिष्ठान म्हणावे. त्या अधिष्ठानाच्या विशेष ज्ञानाने भ्रम निवृत्त होतो. केवल इदंतारूप विषय आधार असून त्या इदंचे अज्ञान अधिष्ठान आहे. 'इदं'चा सर्पामध्ये केवळ संसर्गाध्यास होत असल्याने तो रज्जू आधार आहे. परंतु इदंमध्ये सर्पाचा स्वरूपाध्यास व संसर्गाध्यास असल्याने ते इदं अधिष्ठान आहे (१-३२).

६) प्रत्यक्ष (अपरोक्ष) अध्यासामध्ये प्रत्यक्ष अधिष्ठानाची आवश्यकता आहे. केवळ दोन पदार्थांच्या सारखेपणाने भागत नाही. कोणत्याच इंद्रियाला आत्मा कळत नाही व त्यासारखे दुसरे काही नाही. अध्यस्त व अधिष्ठान, दोन्ही एकाच इंद्रियाने जाणले जात असल्याने व त्यांच्या सारखेपणामुळे कधी मनाने, कधी डोळ्यांनी तर कधी स्वरूपाने अपरोक्षज्ञान होते. उदा. स्वप्नात इंद्रिय व विषय नसतांनाही भ्रमाचे जणू अपरोक्षज्ञान होते. ते ज्ञान केवळ आत्म्याच्या सत्तेवर होते (१-४१).

७) साधकासाठी आवश्यक असलेली निवृत्ती दोन प्रकारची आहे. बाह्य व अभ्यंतर. बाह्य निवृत्तीत हिंसा, सुरापानादि त्याग आवश्यक असून अभ्यंतर निवृत्ती प्रपंचाच्या उपशमाच्या स्वरूपाची आहे. पहिली विधिविधानाप्रमाणे आहे व प्रयत्नाने साध्य होते. आत्मस्थितीत प्रपंचाचा उपशम होतो व ती स्थिती प्रयत्नाने प्राप्त होत नाही. ती अभावस्वरूप असून कोणत्याच विधिविधानाच्या अधीन नाही (१-८७).

८) बाह्य निवृत्ती मायामय व मिथ्या आहे. अभ्यंतर निवृत्ती पारमार्थिक सत्य आहे. बाह्य निवृत्तीचा आधीपासून अभाव (प्राक् अभाव) नाही पण प्रपंचोपशमरूप निवृत्तीचा प्राक् अभाव होता. आत्मस्थितीत तिचा अभाव आहे (१-८८).

९) जहत्-अजहत् लक्षणेने अखण्डार्थबोध होतो. म्हणजे जीव आणि ब्रह्म ह्यांचे ऐक्य अनुभवाला येते. वाक्यातील काही भागाचा त्याग करून काहीचा स्वीकार करणे हे त्या लक्षणेचे स्वरूप आहे. 'तोच हा देवदत्त' मध्ये विरोधी स्थळ व काळ ह्या भागाचा त्याग करून व्यक्तीचा स्वीकार

करावयाचा असतो. ‘**अहं ब्रह्मास्मि**’ ह्या वाक्यात अहंवाच्य अहंकार व ब्रह्मवाच्य अज्ञान ह्या दोन्हींचा ह्या लक्षणेप्रमाणे उपयोग करून दोन्हीतील चेतनांचा अखण्डार्थबोध होतो. ह्या सरणीमध्ये ‘ब्रह्म’ हा शब्द ‘**मम योनिर्महत् ब्रह्म**’ ह्या गीताश्लोकानुसार अज्ञानवाचक मानला आहे (१-१६६).

१०) गौणीवृत्ती व लक्षणावृत्ती ह्यातील फरक असा - जाणावयाच्या पदार्थाबरोबर गुणांचा संबंध आला असता गौणी व केवळ संबंध आला असता लक्षणा वृत्ती म्हणावे (१-१७२). उदा. ‘गंगेवरील घर’ ह्या शब्दयोजनेत गंगेच्या प्रवाहावरील घर असणे शक्य नाही. लक्षणावृत्तीने काठ स्वीकारावा. ‘हा मुलगा सूर्यच आहे’ ह्या वाक्यात ‘सूर्यासारखा तेजस्वी’ असे गौणीवृत्तीने स्वीकारावे लागते.

११) वेदान्तशास्त्राच्या अभ्यासात अखण्डार्थबोधाची प्रक्रिया फार मार्मिक असून ती सारसंग्रह टीकेत चांगल्या रीतीने समजाविली आहे. वाच्यार्थातील तत्काल समोर येणारा विरोध, लक्षणेचा वापर करून सहजपणे दूर करता येतो (१-१६५).

१२) ‘**नेति नेति**’ सारख्या निषेधवाक्यांनी सुद्धा अखण्डार्थबोध होऊ शकतो. सर्व दृश्यप्रपंच अध्यस्त ठरल्यामुळे त्याचे अधिष्ठान ब्रह्म स्वीकारावेच लागते. ते एकमेव असल्याने अखण्डार्थबोधक आहे (१-२५१).

१३) स्वामी सर्वज्ञात्ममुनी जीव व ब्रह्म ह्यांच्या नात्याच्या संदर्भात बिंबप्रतिबिंबवादाचा पुरस्कार करतात. किंबहुना सर्व दृश्य पदार्थांच्या बाबतीत ते हाच संबंध मानतात. जीव व जड, जीव व परमेश्वर, जीव व अन्य जीव, जड व दुसरा जड पदार्थ, जड व परमेश्वर ह्यांतील भेद कल्पित आहेत. अज्ञानामुळे भासणाऱ्या ह्या भेदांनी ब्रह्म दूषित झाल्यासारखे वाटते. अविद्येमध्ये पडलेल्या चैतन्याच्या प्रतिबिंबाला ईश्वर म्हणावे व अन्तःकरणातील चित्‌च्या प्रतिबिंबाला जीव म्हणावे (१-२).

१४) संक्षेप शारीरकात अविद्या व जीव एक-एकच मानले आहेत. अज्ञान एक असूनही त्याचे बुद्धिपरत्वे अंश आहेत व एका बुद्धीतील अज्ञान जाताच तो जीव मुक्त होतो. उदा. आकाशात उडणारे पोपट मुक्त असतात पण पिंजऱ्यातील आकाशात राहणारा बद्ध असतो (२-१२८, १२९)

१५) ब्रह्मसूत्र शांकरभाष्याप्रमाणेच संक्षेप शारीरकात चार अध्याय पहिल्या चार सूत्रांप्रमाणे आहेत. अ) अथातो ब्रह्मजिज्ञासा - त्वंपदपर, ब) जन्माद्यस्य यतः - ईश्वरपर, क) शास्त्रयोनित्वात् - साधनपर व ड) तत्तुसमन्वयात् - जीवब्रह्मैक्य (फल) सांगणारा, असे ते अध्याय आहेत.

१६) ब्रह्म हे अज्ञानाचा आश्रय व विषयही आहे. जीव आश्रय व ब्रह्म विषय असे नाही. उदा. एका कुंभाराच्या घरात माती, चक्र, पाणी, दोरी इत्यादि घट तयार करण्यासाठी लागणाऱ्या पदार्थांमध्ये परस्परांत कार्यकारणभाव आहे. त्याच प्रमाणे जे अज्ञान ब्रह्माच्या आश्रयाने राहते तेच त्याला विषय करते. जीवाला जर अज्ञानाचा आश्रय मानले तर अन्योन्याश्रय दोष येतो. जसे - जीवत्वामुळे अज्ञान व अज्ञानामुळे जीवत्व.

१७) अज्ञान भावरूप आहे - अभावापासून भाव कधीच निर्माण होत नाही. ‘**अज्ञानेनावृतं ज्ञानं**’

(गीता ५-१५) ह्या श्लोकात, अज्ञान ज्ञानावर आवरण घालण्याचे कार्य करते, असे म्हटले आहे. कार्य करणारे काहीच अभावरूप म्हणता येत नाही.

१८) मूल व तूल अशा दोन अविद्या - जीवभाव असूनही जिचा बाध होतो ती स्वप्नरूप अविद्या तूल असून जीवभाव गेल्याशिवाय बाध न होणारी दृश्य प्रपंचरूप अविद्या मूल आहे. ब्रह्मज्ञानाने जीवभाव जातो व मूल अविद्येचा बाध होतो. केवळ झोपेतून जाग आल्याने स्वप्नरूपी तूल अविद्येचा बाध होतो (२-३३).

१९) आत्मज्ञानाचा कोणताही विधी नाही. ते विधीच्या अधीन नाही. उदा. 'स्वर्गप्राप्तीसाठी यज्ञ करावा' असा विधी सांगितला आहे. आत्मा नित्यप्राप्त असल्याने त्याचे ज्ञानही नित्यप्राप्तच आहे (१-४५०).

२०) जगाचे उपादानकारण व निमित्तकारण एक चेतन ब्रह्मच आहे. चेतन ब्रह्म प्रकृतिद्वारा दृश्य जगताचे परिणामी उपादानकारण आहे व तेच निमित्तकारणही आहे. '**यतो वा इमानि भूतानि जायन्ते**' ह्यातील 'यतः' ही पंचमी विभक्ती आहे. उदा. त्या त्या घटाची माती भिन्न भासली तरी माती एकच. श्रुती व तर्क ह्या दोन्हींनी असे कळते की निमित्त व उपादानकारण वेगळे असलेच पाहिजेत असा नियम नाही (१-५००).

२१) लक्ष्याची तीन लक्षणे आहेत - स्वरूप, विशेषण व उपलक्षण. स्वरूप - लक्ष्याचे स्वरूप. उदा. आकाश पोकळ आहे. विशेषण - लाल घोडा. दुसऱ्या रंगांच्या घोड्यांपासून वेगळा. उपलक्षण - ह्यालाच तटस्थलक्षण असेही म्हणतात. उदा. कोणी घर ओळखण्यासाठी तत्कालिक प्रश्न विचारला असता 'कावळा बसला आहे ते घर' असे दिलेले उत्तर घराचे उपलक्षण सांगते. कावळा सतत नसतो पण तेव्हा होता (१-५१४).

२२) उपादानकारण अचेतन असले पाहिजे असा नियम नाही. उदा. संपूर्ण स्वप्नसृष्टीचे उपादानकारण चेतन आत्मा आहे. कोळ्याच्या धाग्याचे उपादान व निमित्त कारण चेतन कोळी आहे (१-५३०,५३१).

२३) तीन प्रकारची लक्षणा - जहत्, अजहत् व जहत्-अजहत्. जहत् - काही भाग पूर्णपणे सोडून देऊन वाक्याची संगती लागते. उदा. 'पानावर बसा' ह्या वाक्यात पान सोडून देऊन वाक्यात नसलेल्या पाटावर बसावयाचे असते. अजहत् - 'कोर्टात काळ्या कोटांची गर्दी दिसते' ह्या वाक्यात काळ्या कोटांबरोबर ते घालणारे वकील गृहीत धरून वाक्याची संगती लावता येते. जहत्-अजहत् - वाक्यातील विरुद्ध देशकालादिकांचा त्याग करून अनुकूलाचा स्वीकार करावा लागतो. उदा. तेच हे डॉक्टर' ह्या वाक्यात 'डॉक्टर' हा अनुकूल शब्द असून 'तेच' म्हणजे दवाखान्यात व हिरव्या कपड्यात पाहिलेले व 'हे' म्हणजे आता पर्यटणस्थळी व तशा पोशाखात पाहिलेले असा अर्थ होतो. 'तत्त्वमसि' महावाक्याला हीच लक्षणा वापरावी लागते (१-१५४,५५).

२४) प्रत्यक्षादि प्रमाणे वेदान्ताला बाधक नाहीत. कारण वेदान्त व व्यवहार ह्यांचे विषयच वेगळे

आहेत. व्यावहारिक प्रमाण अज्ञाताचा बोध करण्यासाठी आहे. वेदान्ताने जे अनुभवरूप आहे त्याचे ज्ञान होते. म्हणून 'एकमेवाद्वितीयम्' इत्यादि श्रुतींचा प्रत्यक्षादि प्रमाणांनी बाध होत नाही. त्या अबाधित राहतात (२-७).

२५) क्षणिक विज्ञानवादी बौद्ध व वेदान्त ह्यांत साम्य नाही - 'सत्यस्वरूप ज्ञानाव्यतिरिक्त सर्व दृश्य अनादि वासनेने प्राप्त होणारे शून्यरूप आहे' असे बौद्धमत आहे. वेदान्त त्या सर्वाला अध्यस्त मानतो. पण वेदान्तामध्ये प्रमाता, प्रमाण, प्रमेय इत्यादि सर्व लोकव्यवहाराची व्यवस्था आहे. ती विज्ञानवादात नसल्याने दोन्हीत साम्य नाही (२-२७).

२६) सांख्यांना इष्ट असणारा परिणामवाद वेदान्ताला मान्य नाही. वेदान्त विवर्तवाद मानतो. 'कारणस्य पूर्वरूप अपरित्यागेन अभिन्नं रूपान्तरम्' हे विवर्ताचे लक्षण मधुसूदनसरस्वती करतात. दृश्य जगत् हा चेतनाचा परिणाम नसून ते त्यावरील विवर्त आहे (२-५५).

२७) विवर्तवादामुळे प्रपंचाचे मिथ्यात्व समजणे सोपे होते. '**इन्द्रो मायाभिः पुरुरूप ईयते।**' ह्या श्रुतिवाक्याची त्यामुळे चांगली संगती लागते. चेतनाच्या व्यापाराशिवाय अचेतन वस्तू काही करू शकत नाही हा नियम असल्याने दृश्य जगत् हा पंचभूतांचा संघात आहे हे मत टिकत नाही (२-६९).

२८) वैशेषिकांचा आरंभवादही विचाराला टिकत नाही. ज्यांनी आरंभ होतो तेच पुढे त्याच्या विस्तारात असले पाहिजे, परंतु त्यांच्या मतात द्व्यणुकाचा त्र्यणुक होतो तरीही द्व्यणुकाचा परिमाण ऱ्हस्व असून त्र्यणुकाचा दीर्घ आहे. ही विसंगती आहे (२-७०).

२९) सूत्रकार बादरायण आरोपदृष्टी, अपवादकदृष्टी व व्यामिश्रदृष्टी अशा तीन दृष्टी सांगतात. आरोपदृष्टीने प्रपंचाचा ब्रह्मावर आरोप करणे, अपवादकदृष्टीने कार्यरूप द्वैताची उपशांती होणे व व्यामिश्रदृष्टीने ब्रह्मावर प्रपंचाचा विवर्त होतो असे मानणे. येथे प्रपंचाला स्वीकृती असून अभावही मानला असल्याने त्या दृष्टीत मिश्रण आहे (२-८२).

३०) ह्या तीनही दृष्टी पुरुषनिष्ठ आहेत. परिणामदृष्टी अधम, व्यामिश्रदृष्टी मध्यम व अन्तिम अपवादकदृष्टी हितकारक आहे. ह्या तीनही दृष्टी दृश्य जगताच्या अधिष्ठानाशी आपापल्या पद्धतीने निष्ठा सांभाळतात (२-८६).

३१) एक जीव मानण्याने बंधमोक्षाची उत्तम व्यवस्था लागते. जीव अनेक मानण्याची आवश्यकता नाही. एकजीववादात अन्तःकरणे अनेक असल्याची कल्पना मान्य असल्याने अनेक जीव मानण्याची जरूरी नाही (२-१२९).

३२) कल्पित पिशाच्चाने घाबरून मृत्यू होऊ शकतो पण आकाशाच्या कल्पित निळेपणाने मरण येत नाही. त्याप्रमाणे श्रीगुरू कल्पित असले तरी मोक्षदाते असू शकतात. व्यावहारिक गुरू व्यावहारिक अज्ञान दूर करू शकतात (२-२२७).

३३) तिसऱ्या अध्यायात ब्रह्मबोधाची साधने सांगितली आहेत. बुद्धी बेताची असणाऱ्यांना निर्विशेष ब्रह्माचा साक्षात्कार होत नाही. त्यांना सगुणब्रह्मचिंतनाचीच आवश्यकता आहे. निर्गुणासाठी 'तत् व

त्वम्' पदांचे यथार्थ चिंतन करावे लागते (३-५४).

३४) अंतरंग व बहिरंग साधन - ब्रह्मस्वरूपाची जिज्ञासा निर्माण होण्यासाठी बहिरंग साधन उपयोगी पडते. प्रत्यक्ष साक्षात्कार करून देणाऱ्या साधनाला अंतरंग साधन म्हणतात (३-३३०). अदृष्टाच्या (शुद्ध पुण्य) मदतीने हे साध्य होते. बहिरंग साधन व्यंजक असून अंतरंग साधन कारक आहे. व्यंजक साधन सहकारी साधन असून कारक प्रत्यक्ष साधन आहे.

३५) ब्रह्मविद्येच्या अंतरंग साधनात प्रापंचिकांनाही अधिकार आहे. केवळ संन्याशांसाठी ते नाही. चारही आश्रमी मुमुक्षूंना त्यात अधिकार आहे (३-३५६,५९).

३६) चौथा फलाध्याय आहे. वेदान्तप्रमाणाने अखण्डब्रह्माकारवृत्ती तयार होऊन मुमुक्षूच्या सकलदुःख निवृत्तीसह परमानंदाची प्राप्ती त्याला होते. श्रीमधुसूदन सरस्वतींनी मूळ ग्रंथावरील त्यांच्या टीकेत माध्यमिक, योगाचार, अर्हत, कणाद, नैयायिक, प्राभाकर, भाट्ट, सांख्य, पातंजल, त्रिदंडी, पाशुपत इत्यादि सर्व मतांचा परामर्श घेऊन वेदान्तमताचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे (४-१).

३७) मोक्षासाठी कर्माचा उपयोग नाही - मुक्ती कर्माने सिद्ध होत नाही. मुक्तीनंतर कर्माचे बंधन नाही. ज्ञान व कर्म ह्यांचा समुच्चय नाही म्हणजे ते एकत्र राहू शकत नाहीत (४-३३).

३८) ब्रह्मज्ञानाने 'स्व'विषयीच्या अज्ञानाची निवृत्ती होते. त्याचबरोबर अज्ञानकार्य असलेल्या दृश्य जगाचा बाध होतो (४-३८).

३९) 'जीवन्मुक्ती' ह्या कल्पनेत आत्मस्थितीची स्तुती केली आहे. ती ब्रह्मविद्येचीही स्तुती आहे. अविद्येची आवरणशक्ती तत्त्वज्ञानाने नष्ट झाली तरी विक्षेपशक्ती उरत असल्याने जीवन्मुक्ती मानावीच लागते. विद्वानांचा अनुभव हेच तिचे प्रमाण आहे (४-४३,४४).

सर्वज्ञात्ममुनींचे बाराशे चाळीस श्लोक, त्यावरील मधुसूदनसरस्वतींची प्रदीर्घ टीका व ह्या दोन्हींचा स्वामी दिव्यानंदगिरींनी केलेला अनुवाद ह्यामुळे हा ग्रंथ सुमारे सोळाशे पृष्ठांचा, दोन खंडात केला आहे. ह्या लेखात त्यांतील ठळक बाबी किंवा वैशिष्ट्ये सांगण्याचा प्रयत्न केला आहे, तसेच अन्य टीकाही येथे विचारात घेतल्या आहेत. विचारसागर रहस्यासारख्या ग्रंथात हा ग्रंथ व अन्य मान्य ग्रंथ ह्यांचे ओझरते उल्लेख येतात. मराठी भाषेत हे ग्रंथ उपलब्ध नाहीत. त्यांतील 'संक्षेप शारीरकम्' ह्या ग्रंथाचा अत्यल्प परिचय करून देण्याचा हा प्रयत्न मूळ ग्रंथाच्या अभ्यासाकडे प्रवृत्ती निर्माण करील असा विश्वास वाटतो.

रत्नागिरी येथील डॉ. ज्योत्स्ना पाटणकर यांनी कष्ट, तंत्रज्ञान, ग्रंथाच्या विषयाचे आवश्यक तेवढे ज्ञान व समर्पणभाव यासह ही अक्षरजुळणी केली आहे त्यामुळे हा ग्रंथ आहे त्या स्वरूपात प्रकाशित होऊ शकला.

डॉ. श्री. द. देशमुख

।।श्री।।

# प्रकाशकीय

'संक्षेप शारीरक भावदर्शन' हा ग्रंथ आजच्या मंगल दिनी सर्व मराठी भाषिक अध्यात्मप्रेमी अभ्यासक आणि साधक ह्यांना सादर करण्यात आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

ह्या ग्रंथाबद्दल थोडक्यात माहिती करून घेण्यासाठी आपणास आद्य शंकराचार्यांच्या काळापर्यंत मागे जावे लागेल. आद्य शंकराचार्यकालीन प्राचीन भारतात वैदिक हिंदूधर्माला आणि प्राधान्याने हिंदू अद्वैत तत्त्वज्ञानाच्या श्रेष्ठत्वाला विविध कारणांमुळे धक्का बसला होता आणि आव्हाने दिली जात होती. आचार्यांचे एक कार्य, हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञान ह्यांचे श्रेष्ठत्व निर्विवादपणे प्रस्थापित करणे आणि तत्कालीन हिंदू समाजाचा आपल्या व तत्त्वज्ञानाच्या श्रेष्ठत्वावरील विश्वास टिकवून ठेवणे हे होते. आचार्यांनी वाणी व लेखणी ही दोन्ही शस्त्रे ध्येयपूर्तीसाठी वापरली. अवैदिकांना वादात पराभूत करून धर्मरक्षणाचे काम वाणीने केले तर हिंदू तत्त्वज्ञान आणि जीवनपद्धती ह्यातील लहानसहान गोष्टी – ज्या जीवनाचे अंतिम ध्येय जाणण्याला व एकूणच जीवनसाफल्यासाठी कारणीभूत ठरतात – त्यातील मर्म किंवा रहस्य सर्वांना समजावून देण्यासाठी आपली लेखणी वापरली. त्यांनी लोकांची बुद्धी आणि मने जिंकली. ह्याचा परिणाम म्हणून हिंदू धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्यावर होणारी वैचारिक आक्रमणे थांबली. त्यांचे श्रेष्ठत्व कायमच राहिले.

परंतु हे कार्य एकाच पिढीने होण्यासारखे नव्हते. एवढ्या मोठ्या कालौघात एक पिढी म्हणजे फारच अल्प काळ होय. म्हणून हे कार्य आचार्यांच्या शिष्यांना व त्यांच्या पुढच्या पिढ्यांनाही करावे लागले. एखाद्या कर्तबगार पुरुषाच्या वारसांनी त्याने कमावलेले धन तर सुरक्षित ठेवावेच पण स्वतःच्या कर्तबगारीने त्यात भरही घालावी त्याप्रमाणे आचार्यांचे शिष्य श्रीसुरेश्वराचार्य (नैष्कर्म्यसिद्धी), सुरेश्वराचार्यांचे शिष्य श्रीसर्वज्ञात्ममुनि (संक्षेप शारीरक) इत्यादिंनी अद्वैततत्त्वज्ञानपर ग्रंथनिर्मिती करून आचार्यांची परंपरा चालू ठेवली. सरळ व सोप्या भाषेत समग्र वेदान्तशास्त्राचे सार सांगणाऱ्या ग्रंथात उपदेशसाहस्री, नैष्कर्म्यसिद्धी व संक्षेप शारीरक ह्या तीन श्रेष्ठ ग्रंथांचा समावेश होतो.

प्रस्तुत ग्रंथ हा श्रीसर्वज्ञात्ममुनींनी रचलेल्या 'संक्षेप शारीरक' ह्या ग्रंथाचा अनुवाद व त्यावर लेखकाने केलेले विवरण आहे. आचार्यांनी ब्रह्मसूत्रांवर जे भाष्य केले आहे, त्यातील पहिल्या चार सूत्रांवरील भाष्यावर श्रीसर्वज्ञात्ममुनींनी पुनश्च सविस्तर टीका केली आहे. तोच हा संक्षेप शारीरक ग्रंथ. ह्या ग्रंथात चार अध्याय असून बाराशेचाळीस श्लोक आहेत.

आद्य शंकराचार्यांच्या समग्र साहित्याचा विविध भारतीय भाषांमधून अनुवाद केला गेला व त्यावर विचार देखील मांडले गेले. मराठी भाषा ह्याला अपवाद नाही. परंतु आचार्यांच्या शिष्यांची ग्रंथसंपदा प्राधान्याने संस्कृतमध्येच बंदिस्त राहिली. निदान मराठीत तरी ह्या ग्रंथाचा अनुवाद

झाल्याचे माहितीत नाही. प. पू. डॉक्टरकाकांनीच म्हटल्याप्रमाणे अधिकाधिक मुमुक्षूंची शास्त्र-ग्रंथांच्या अभ्यासाकडे प्रवृत्ती व्हावी आणि शांकर अद्वैत तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे प्राचीन ग्रंथ मराठी-मध्ये उपलब्ध व्हावेत हा नैष्कर्म्यसिद्धी व संक्षेप शारीरक ह्या ग्रंथांच्या भाषांतरामागे उद्देश आहे.

ह्या ग्रंथाचे लेखक, आमचे श्रीगुरू, प. पू. डॉ. श्रीकृष्ण द. देशमुख (मुरगुड) म्हणजेच आज महाराष्ट्र व देशविदेशातील, विशेषतः मराठी अध्यात्मप्रेमींमध्ये अत्यंत सुपरिचित आणि पूजनीय असलेले व्यक्तिमत्व होय. 'समर्थ' ह्या संक्षिप्त नावाने जसा सर्व महाराष्ट्र श्रीसमर्थ रामदासस्वामींना ओळखतो, त्याचप्रमाणे 'डॉक्टरकाका' ह्या संक्षिप्त आणि लाडक्या नावाने डॉ. श्रीकृष्ण द. देशमुख ह्यांना आज महाराष्ट्रातील व देशविदेशातील सर्व अध्यात्मप्रेमी, धर्मप्रेमी आणि साधक ओळखतात. डॉक्टरकाकांच्या प्रतिपादनाचे वैशिष्ट्य हे आहे की प्रारंभी जटील वाटणारी प्रमेये सहज व सरळ भाषेत, सोपे व विपुल दृष्टांत देत ते समजावून सांगतात. ही त्यांची हातोटी विलक्षण आहे. स्वसंवेद्य, वस्तुतंत्र इ. शास्त्रीय शब्द त्यांच्या लिखाणात वारंवार येतात खरे पण लिखाणाच्या ओघात त्यांचे स्पष्टीकरण पण येते. त्यांचे वर्म व अर्थ एकदा कळला की तेच शब्द सोपे होऊन जातात, इतकेच नव्हे तर हवेसे वाटू लागतात.

श्रीगुरू प. पू. डॉक्टरकाकाच आपल्या 'नैष्कर्म्यसिद्धी भावदर्शन' ह्या ग्रंथातील आपल्या मनोगतात म्हणतात त्याप्रमाणे मोक्षशास्त्र ' ' (
व ) असूनही तसे मांडले जात नाही. पण आम्ही असे म्हणतो की खरोखर ते स्मार्टली आणि आजच्या काळाला अनुरूप पद्धतीने मांडण्याचे सामर्थ्य आणि हातोटी श्रीगुरू डॉक्टरकाकांच्या प्रतिपादनात आणि लेखनशैलीत आहे. ग्रंथाला अनुरूप भाषेचा साजशृंगार चढविण्याच्या लेखकाच्या कौशल्याची प्रशंसा अनेक अधिकारी व्यक्तींनी केली आहे.

प्राचीन काळापासून पूर्वसूरींनी असे सांगून ठेवले आहे की जीवाच्या शाश्वत कल्याणाचा मार्ग म्हणजे वेदांच्या व श्रीगुरूंच्या आज्ञेनुसार जीवनाची आखणी व तदनुसार आचरण करणे. परंतु वेदोनारायणाच्या आज्ञा जाणून घेणे, त्यातही यथार्थपणे जाणून घेणे सर्वांना सुलभ नव्हते. म्हणून मग श्रीभगवंतांनी दयाळूपणे सर्व उपनिषदांचे सार काढून श्रीमद्भगवद्गीतेचा अमृतकुंभ सर्वांना दिला, जेणे करून सर्वांनी आत्मतत्त्व जाणून घेऊन अमर व्हावे. परंतु गीतेची रचनादेखील देववाणी संस्कृतमध्येच होती. कालांतराने सामान्य जनांना तिचेही आकलन कठीण झाले. म्हणून श्रीज्ञानदेवांनी मायबोलीचा महिमा गात श्रीज्ञानेश्वरीची रचना केली. पुढील काळात संतशिरोमणी श्रीतुकाराममहाराजांनी '**वेदांचा तो अर्थ आम्हांसिचि ठावा**' असे यथार्थ आणि आत्मविश्वासपूर्ण उद्गार काढीत वेदांतील ज्ञान आपल्या अभंगातून प्रगट केले. श्रीसमर्थ रामदासस्वामींनीही दासबोधात म्हटले की '**ऐक शिष्या येथींचे वर्म। स्वयें तूंचि आहेस ब्रह्म।**' हे तर सरळ सरळ तत्त्वमसिचेच प्रतिपादन आहे. ह्याच अनुषंगाने प. पू. डॉक्टरकाका साधारणपणे असे मार्गदर्शन करतात की जीवाने ईश्वराच्या आज्ञा

मानाव्या. त्या वेदांमध्ये दिलेल्या आहेत. वेदांचे अध्ययन करणे शक्य नसेल तर संतांच्या आज्ञा पाळाव्यात कारण दोन्ही एकच आहेत. परंतु आजच्या आधुनिक युवकालाच काय, पण मध्यमवयीन साधकांनाही, संत साहित्य सुद्धा कोणाचे तरी मार्गदर्शन असल्याशिवाय यथार्थ समजत नाही. भारतीय तत्त्वज्ञानाचे सर्वोच्च शिखर म्हणजे वेदान्तातील 'केवळ ब्रह्मच सत्य असून जीव हा ब्रह्मरूपच आहे, अन्यथा काहीच नाही' हा सिद्धांत. वेदान्त आणि संतसाहित्याचा सखोल आणि सप्रचीत अभ्यास असलेल्या डॉक्टरकाकांनी सर्वांना सहज समजावे म्हणून आजच्या भाषेत (विषय काहीसा दुर्बोध असला आणि काही जणांना वेदान्ताच्या परिभाषेची दहशत वाटत असली तरी) दृष्टांत आणि उदाहरणांनी समजावून, संतसाहित्याचा आधार घेत, वेदान्त आणि तत्त्वज्ञान ह्या विषयांवर विपुल मार्गदर्शक ग्रंथरचना केली आणि 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' म्हणणाऱ्या अनेक मुमुक्षू आणि साधकांची सोय केली. त्या दृष्टीने पाहता प. पू. डॉक्टरकाकांच्या वाङ्मयाचे मोल हे वेदवाङ्मयाइतके, संतसाहित्याइतकेच आहे.

ही वेदगंगा ग्रंथरूपाने आपणासारख्या विचक्षण, अध्यात्मप्रेमी अधिकारी जनांपर्यंत पोहोचविण्याच्या कार्यात श्रीकृपा प्रकाशनाचा सहभाग असावा ही श्रीगुरुकृपा व आमचे महद्भाग्यच होय. इथे आमच्या भावना व्यक्त करण्यासाठी महाभारतातील एका प्रसंगाचा आधार घेणे अप्रस्तुत होणार नाही. महाभारताच्या आरंभी भगवान म्हणाले की मी या युद्धात हाती शस्त्र घेणार नाही. नंतर महाभागवत श्रीभीष्मांनी प्रतिप्रतिज्ञा केली की मी भगवंताला हाती शस्त्र धरायला लावीनच. एक दिवस भीष्मांनी एवढा पराक्रम गाजवला आणि पांडवसेनेचा एवढा संहार मांडला की भगवंतांना आपली प्रतिज्ञा मोडून (आणि भक्ताच्या प्रतिज्ञेचा मान राहावा म्हणूनही) खाली पडलेले रथाचे चाक हाती घेऊन भीष्मांवर आक्रमण करावे लागले. ह्या सर्व प्रसंगाचे मनोज्ञ वर्णन कवींनी खालील श्लोकात केले आहे –

**असा येता देखे रथ निकट तो श्यामल हरी। नृपा गांगेयाच्या हृदयीं भरल्या प्रेमलहरी।**
**शरातें चापातें त्यजूनि वदला गद्‌गद् रवें। जगन्नाथें केलें मज सकल लोकांत बरवें।।**

भीष्मांच्या मनात हा जो 'जगन्नाथें केलें मज सकल लोकांत बरवें' हा कृतार्थतेचा आणि कृतज्ञतेचा हृदयंगम भाव आहे तोच आज ह्या ग्रंथप्रकाशनाच्या प्रसंगी श्रीकृपा प्रकाशन संस्थेचे सर्व पदाधिकारी इतकेच नव्हे तर ह्या ग्रंथाच्या निर्मितीत ज्यांचा ज्यांचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष हातभार लागला त्या सर्व व्यक्तींच्या मनीं आहे हे नमूद करून ठेवावेसे वाटते.

प. पू. डॉक्टरकाकांचे ग्रंथ अभ्यासू साधकांना उपलब्ध व्हावेत म्हणून १९९१ पासून प्रकाशन सेवा व्यक्तिगत रूपात सुरू झाली. कालौघात त्यात बदल होत गेले व श्रीगुरुकृपेने हे भाग्य आज श्रीकृपा प्रकाशन, नागपूर ह्या संस्थेला लाभले आहे. श्रीकृपा प्रकाशनाबद्दल ज्या सर्वांना आत्मीयता आहे अशा असंख्य बंधुभगिनींप्रति अभिवादनपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी देखील आजचा प्रसंग अत्यंत योग्य आहे. हे आपल्या श्रीगुरूंचे कार्य आहे आणि ते पुढे जायला हवे ह्या विचारातून

असंख्य बंधुभगिनींच्या शुभेच्छा, आशीर्वाद आम्हाला मिळत असतात. इतकेच नव्हे तर 'श्रीगुरूंचे कार्य' ह्या भावनेतून स्नेहाचा, मदतीचा पुरवठा होत राहतो. ह्याचे परिणामस्वरूप म्हणूनच श्रीगुरुकार्याचा हा वृक्ष बहरला आहे. आपणा सर्वांच्या सहकार्याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे आणि त्यासंबंधी सविस्तर ऋणनिर्देश करण्याची संधीच आम्ही शोधत होतो. ह्या ग्रंथप्रकाशनाच्या निमित्ताने आम्ही ती साधून घेत आहोत, म्हणूनच हे विस्तारपूर्वक निवेदन.

प्रस्तुत श्रेष्ठ ग्रंथाला स्वस्तिवाचन आजचे भारतातील संततुल्य व वेदान्त आणि तत्त्वज्ञान ह्या विषयांवरील अत्यंत श्रेष्ठ अधिकारी परम वंदनीय स्वामी श्रीगोविंददेवगिरिजी महाराज (पूर्वाश्रमींचे श्रद्धेय मा. श्री. किशोरजी व्यास) ह्यांचे लाभले आहे हा ही भाग्ययोग होय. प. पू. डॉक्टरकाका व स्वामी श्री गोविंददेवगिरिजी महाराज ह्या संतद्वयांना पाहिल्यानंतर '**एक हिरा कोहिनूर। एक कौस्तुभ साचार। एक मोगरा सुंदर। एक तरू गुलाबाचा।**' ह्या दासगणुमहाराजांच्या काव्यपंक्तीची आठवण येते. तसेच, '**साधु दिसती वेगळाले। परी ते स्वरूपीं मिळाले।**' (दास.७.२.३२) ह्या समर्थवचनाचे देखील स्मरण होते. आचार्य गोविंददेवगिरि महाराजांनी ह्या ग्रंथासाठी 'आत्मज्ञानाचा राजमार्ग' ह्या शीर्षकांतर्गत लिहिलेली प्रस्तावना ही ग्रंथवाचक व अभ्यासक ह्यांच्यासाठी अत्यंत मार्गदर्शक झाली आहे. त्यांनी ग्रंथ आणि ग्रंथकर्त्याची वैशिष्ट्ये अतिशय मार्मिकतेने विशद केली आहेत. ह्या ग्रंथाचे प्रकाशन देखील त्यांच्याच पुण्यहस्ते व्हावे, ह्या आमच्या विनंतीचाही त्यांनी स्वीकार केला आहे हा तर आमच्या भाग्ययोगाचा कळसच होय. धन्योऽहं, धन्योऽहं, धन्योऽहं असेच आम्ही येथे नमूद करतो. श्रीगोविंददेवगिरि स्वामींच्या चरणी वंदन करून त्यांचा श्रीकृपा प्रकाशनावर लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा अशी प्रार्थना करतो.

अमरावती येथील संततुल्य व्यक्तिमत्त्व, प. पू. मंदाताई गंधे ह्यांचा अगदी आरंभापासून श्रीकृपा प्रकाशन संस्थेवर लोभ आहे व संस्थेच्या कार्याबद्दल त्यांना अत्यंत आस्था आहे. त्यांच्या अत्यंत व्यस्त अशा दिनक्रमातून सुद्धा आम्हाला आवश्यकता असते तेव्हा त्या आमच्यासाठी वेळ काढतात आणि आम्हाला सर्वतोपरी मार्गदर्शन करून आमच्या कार्यात फार मोठा सहभाग देतात. त्यांच्या ऋणातून उतराई होणे अशक्य आहे. आम्ही ह्या प्रसंगी त्यांच्याप्रती असलेला आदर आणि आमची कृतज्ञता व्यक्त करतो.

या ग्रंथाच्या संपादन आणि अक्षरजुळणीच्या कामी श्रीकृपा प्रकाशन संस्थेच्या आरंभापासूनच्या हितचिंतक आणि ज्येष्ठ स्नेही डॉ. ज्योत्स्नाताई पाटणकर ह्यांनी नेहमीप्रमाणेच निरपेक्ष, निरलस, निस्सीम आणि मुख्य म्हणजे जाणते सहकार्य केले. डॉ. ज्योत्स्नाताईंच्या अध्यात्माच्या सखोल अभ्यासाचा, ग्रंथसंपादन आणि अक्षरजुळणीच्या क्षेत्रात नेहमीच फार फायदा होतो. ह्या ग्रंथसंपादनात व मुद्रिते तपासणे इ. कार्यात यवतमाळ येथील सौ. शैलजाताई रानडे, पुणे येथील सौ. अर्चना कुलकर्णी आणि सौ. जयश्री सांगवीकर व हैद्राबाद येथील सौ. मुक्ता वाळवेकर ह्या भगिनींचे बहुमोल सहकार्य लाभले. ह्या सर्वांनी हे सर्व कार्य अत्यंत निरपेक्षपणे, केवळ

गुरुसेवाभावाने केले आहे. ईश्वरी नियोजनात त्यांची योग्य ती दखल घेतली गेली असेलच परंतु व्यावहारिक सत्तेत आम्ही ह्या सर्वांप्रती आमचा कृतज्ञता भाव व्यक्त करतो.

ह्या ग्रंथाचे मुखपृष्ठ आकर्षक व अर्थपूर्ण व्हावे ह्या दृष्टीने काही संकल्पना आमच्या मनात होत्या. प.पू. डॉक्टरकाकांशीही आम्ही मुखपृष्ठाच्या संदर्भात विचारविनीमय केला व मार्गदर्शन घेतले. हे सर्व सांगली येथील युवा कलाकार कु. मोहिनी गाडगीळ हिने कलात्मकदृष्ट्या प्रत्यक्षात उतरविले. 'नैष्कर्म्यसिद्धी भावदर्शन' ह्या ग्रंथाच्या मुखपृष्ठानंतर आमच्यासाठी तिने साकार केलेले हे दुसरे मुखपृष्ठ. कु. मोहिनीला अनेक अनेक धन्यवाद आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

ह्या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी आम्हाला प. पू. डॉ. श्री. द. देशमुख शिष्यपरिवारातील एका साधकाचे आर्थिक सहकार्य लाभले. तसेच विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यनगरी, पुणे येथे ह्या ग्रंथाचे प्रकाशन व्हावे म्हणून पुणे व पिंपरी चिंचवड येथील साधकांनी सर्वार्थाने सहकार्य केले. ह्या सर्वांप्रती खरे तर नामोल्लेखपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्याची आमची इच्छा होती. परंतु त्या सर्वांनी ह्याविषयी केवळ अनुत्सुकताच नाही तर नावड व्यक्त केल्यामुळे आम्ही त्यांच्या भावनांचा आदर करून नामोल्लेख न करता केवळ त्यांचे आभार मानतो.

ह्या ग्रंथाचे बाह्यरूप आकर्षक व्हावे ह्यासाठी आम्ही यथाशक्ती प्रयत्न केले आहेत. उत्तम बाईंडिंगसह ग्रंथाची बांधणी सुबक व आकर्षक करण्याचे काम नागपूरच्या मुद्रणविश्वातील प्रख्यात मे. मुद्राशिल्प ऑफसेट प्रिंटर्स ह्या संस्थेने केले आहे. मे. मुद्राशिल्पचे श्री. कमलेश मोघे व श्री. संदीप भालेराव ह्यांचे आभार. सर्वात शेवटची पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे प. पू. डॉक्टरकाकांचे श्रीगुरू (आमचे परात्पर श्रीगुरू) ब्रह्मसंस्थ श्रीशंकरमहाराज खंदारकर ह्यांचे चरणांशी तसेच परमपूज्य गुरुपत्नी कै. सौ. काकू (सौ. वसुंधरा देशमुख) ह्यांचे चरणांशी वंदन करून त्यांचे आशीर्वाद मागतो.

सरते शेवटी आम्हाला प्रकाशकीय दायित्व पेलण्याची शक्ती द्यावी ही श्रीगुरुचरणी प्रार्थना करून हे ग्रंथपुष्प माता श्रीसरस्वतीच्या चरणी अर्पण करतो. मराठी भाषिक वेदान्त जिज्ञासू आणि साधकांना आत्मज्ञानाच्या वाटेवर चालतांना ह्या ग्रंथाच्या अभ्यासाचे साहाय्य व्हावे अशी श्रीशारदेच्या चरणी प्रार्थना करून लेखणीला विराम देतो.

इति लेखनसीमा!

श्रीकृपा प्रकाशन
नागपूर

।।श्रीहरिः।।

# प्रस्तावना
## आत्मज्ञानाचा राजमार्ग

**द्रष्ट-दृश्य-समायोगात्प्रत्ययानंद-निश्चयः।**
**यस्तं स्वात्मतत्त्वोत्थं निःस्पंदं समुपास्महे।।**

आपला प्रिय भारत देश सर्वार्थांनी खरोखर सुवर्णभूमी आहे. हिमालयासारखा नगाधिराज भारतमातेच्या मुकुटासारखा शोभतो आहे. तीनही दिशांनी सागर, भारतमातेच्या चरणकमलांचे प्रक्षालन करीत आहेत. गंगा, यमुनेसारख्या अमृतवाहिनी तिच्या गळ्यातील मौक्तिक हारांसारख्या अखंडपणे रुळत आहेत, तर सह्याद्रीचे कडे तिच्या खड्गासारखे शोभायमान आहेत. राजस्थान, कच्छसारख्या रुक्ष वाळवंटी प्रदेशांपासून बंगालसारख्या सुजलाम्-सुफलाम् सदाहरित रूपांपर्यंत वैविध्याने नटलेले विविध प्रांतांचे भूप्रदेश तिने ल्यायलेल्या विविधरंगी वस्त्रांसारखे इंद्रधनुष्यी आकर्षणाचा प्रत्यय देत मुग्ध करतात, तर काश्मीरसारखे गुलाबी नंदनवन तिच्या भालप्रदेशावरील केशराप्रमाणे प्रसन्न करते. आसेतुहिमाचल पसरलेल्या या देशातील असंख्य बोलीभाषा विविध पक्ष्यांच्या कलरवाप्रमाणे आल्हादित करतात आणि या वैविध्यातूनही निरंतर अनुभवली जाणारी सांस्कृतिक एकात्मता कोणालाही केवळ थक्क करून टाकते.

पण तरीही, 'या देशाचे हृदयस्थान कुठे आहे?' याचा शोध घेऊ लागल्यावर येऊन पोहोचावे लागते ते भावमधुर भक्तीपर्यंत होय! जगन्नियंत्या परमेश्वराची आराधना हे या देशातील जनमानसाचे प्राणतत्त्व आहे. त्या प्रभूची असंख्य रूपे, त्याच्याशी वैयक्तिक पातळीवर जोडले गेलेले विविध भाव, त्या त्या भावानुरूप होत असलेले नित्य-नैमित्तिक उपचार, त्याच्या प्रसन्नतेसाठी प्रत्यही कुठे न कुठे श्रद्धासमन्वित उत्साहाने साजरे केले जाणारे उत्सव, निघणाऱ्या यात्रा व भरणाऱ्या जत्रा यांनी या देशाचे वातावरण सदैव गजबजलेले दिसते. यात कुठे विकृती आढळत नाही असे नाही पण शेवटी ती विकृतीच. या देशाची प्रकृती खरे तर भक्तिसंस्कृतीच असे म्हणणे वावगे ठरणार नाही. तथापि भक्ति-भाव हे भारतमातेचे हृदय असले तरी तिचे मस्तिष्क या देशातील अध्यात्मविचार होय! प्रज्ञासंपन्न ऋषींना सहज स्फुरलेल्या अध्यात्मविचाराने खरे तर हा देश अनुप्राणित आहे. '**नाचू कीर्तनाचें रंगीं। ज्ञानदीप लावू जगीं।**' असे म्हणणाऱ्या विठोबाच्या लडिवाळ संत नामदेवरायांनी अगदी नेमकेपणाने या देशातील संस्कृतीचे भावमय हृदय व प्रज्ञासंपन्न मस्तिष्क अभिव्यक्त केले आहे. यातूनही

भारताबाहेरील काही देशात भक्तिभाव संपन्न संतहृदयाचे दर्शन तुरळकपणे होतेही, पण वेद आणि उपनिषदांच्या माध्यमाने आविष्कृत झालेला प्राचीन भारतीय ऋषींचा प्रगल्भ अध्यात्मविचार जगाच्या पाठीवर अन्यत्र कुठेही गवसत नाही. हा अध्यात्मविचार आपल्या प्राचीन ऋषींच्या माध्यमाने विश्वकल्याणाकरिता परमेश्वराने पाठविलेला प्रसाद असून आम्हा भारतवासियांचे ते अक्षय धन आहे. म्हणूनच या अध्यात्मविचाराचे, म्हणजेच वेदान्ताचे, म्हणजे वेदरहस्याचे प्रतिपादन करणाऱ्या उपनिषदांना साहित्यसम्राट श्रीज्ञानेश्वर महाराजांनी वाङ्मय गणेशाच्या मस्तकावरील मुकुटाच्या ठिकाणी अत्यंत शोभणाऱ्या सुगंधी फुलांची उपमा दिली आहे.

**उपरि दशोपनिषदें। जिये उदारें ज्ञान मकरंदें। तियें कुसुमें मुकुटीं सुगंधें। शोभती भलीं।।**

अशा प्रकारे उपनिषदांना सुगंधी फुलांची उपमा देत असतांना त्यांमध्ये ज्ञानरूपी मकरंद म्हणजे मध वैपुल्याने भरलेला आहे हे त्यांनी किती हळुवारपणे लक्षात आणून दिले आहे!

हा ज्ञानरूपी मधाचा ठेवा उपनिषदांच्या इतस्ततः विखुरलेल्या मंत्ररूप पुष्पांतून उपलब्ध असला तरी त्याचा एके ठिकाणी संचय व त्याचा बौद्धिक आस्वाद घेण्यासाठी विभिन्न चषकांतून तर्कशुद्ध मांडणी करण्याचे काम म्हणजे एक प्रचंड आव्हानच होय! याकरिता आवश्यकता होती एखाद्या अशा विभूतीची, ज्याच्या प्रज्ञेला संपूर्ण वेदार्थ तळहातावरील आवळ्याप्रमाणे सहज संपूर्ण व स्पष्ट दृग्गोचर होईल. या थोर विषयाला असे महान सत्पुरुष लाभले, ते भगवान् वेदव्यास महामुनी होत. संपूर्ण भारतीय विचारांची पुनर्मांडणी करणाऱ्या वेदव्यासांनी एका वेदाचे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या चतुष्टयीत विभाजन केले. वेदवेदान्तातील विचार सामान्य लोकांनाही कळावा म्हणून कथात्मक सुलभ शैलीत अठरा पुराणांची रचना केली आणि महाभारताच्या माध्यमाने तत्कालीन संपूर्ण भारतीय संस्कृतीचा ज्ञानकोश सिद्ध करून सांस्कृतिक ज्ञानाचे व संस्कृतिसंरक्षणाचे महत्कार्य इतक्या विलक्षण पद्धतीने साधले की ते संपूर्ण विश्वाचे आचार्य व भारतीय जगद्गुरू म्हणून सहज स्वीकृत झाले.

महर्षि वेदव्यासांच्या या अगाध साहित्यसागरातील अद्भुत आणि अक्षय रत्न म्हणजे त्यांनी लिहिलेली ब्रह्मसूत्रे होत. उपनिषदे म्हणजे वेदान्त होय. 'वेदान्त' शब्दाचे दोन अर्थ आहेत. वेदांचा अंतिम भाग किंवा वेदांतील रहस्य! ही उपनिषदे म्हणजे सुद्धा भिन्न भिन्न ऋषींना त्यांच्या समाधिअवस्थेत स्फुरलेले सिद्धांत होत. यातील अगदी प्रधान म्हणून गणल्या गेलेल्या दहा-वीस उपनिषदांच्यामध्येही सकृत्दर्शनी अनेक ठिकाणी मतभिन्नता आढळते. त्यामुळे एकएकटे उपनिषद् वाचत असतांना जरी सिद्धांत कळले असे वाटले असले, तरी साकल्याने उपनिषदांचा अभ्यास करतांना या परस्परविरोधी प्रतिपादनाने कोणीही जिज्ञासू गोंधळून जाणे स्वाभाविकपणे घडते. या परस्परविरोधी दिसणाऱ्या वचनांची सुसंगती लावून त्यामध्ये असलेली सुसूत्रता तर्कशुद्ध पद्धतीने दाखवून देणे आणि या परस्परविरोधाचा परिहार करणे हे आवश्यक पण अत्यंत कठीण कार्य होय. भगवान् वेदव्यासांचे मानव जातीवरील अमूल्य उपकार म्हणजे त्यांनी या संपूर्ण औपनिषद् विचारांची

मांडणी पाचशे पंचावन्न सूत्रांमध्ये केली. सूत्रवाङ्मय हा संस्कृत भाषेतील विशेष रचना प्रकार आहे.

**अल्पाक्षरमसंदिग्धं सारवत् विश्वतोमुखम्।**

**अस्तोभमनवद्यं च सूत्रं सूत्रविदो विदुः।।** (स्कं. पु.)

या व्याख्येनुसार एखादा विचार कमीत कमी शब्दात बिनचूकपणे ज्यात मांडला जातो अशी अर्थगर्भ व निर्दोष शब्दरचना म्हणजे सूत्र होय! महर्षी वेदव्यासांनी संपूर्ण उपनिषद् वाङ्मयाचे शब्दसारतत्त्व पाचशे पंचावन्न सूत्रांच्या मध्ये मांडून, अगस्तीने एका आचमनात सागर प्राशन करावा तसे वेदान्त तत्त्वज्ञानाचे सार जणू एका पानात आणून सोडले आहे.

या पाचशे पंचावन्न ब्रह्मसूत्रांचे विभाजन चार अध्यायात करण्यात आले असून त्यांना अनुक्रमे समन्वयाध्याय, अविरोधाध्याय, साधनाध्याय आणि फलाध्याय अशी नावे आहेत.

**शास्त्रं ब्रह्मविचाराख्यमध्यायाः स्युश्चतुर्विधाः।**

**समन्वयाविरोधौ द्वौ साधनं च फलं तथा।।**

पुन्हा या प्रत्येक अध्यायाचे विभाजन चार-चार पादांमध्ये अंतर्गत विषयांनुसार करण्यात आलेले आहे. अशा रीतीने सर्व ब्रह्मसूत्रे चार अध्यायांतील सोळा पादांमध्ये, विषयानुसार मांडली गेल्यामुळे जिज्ञासूंची मोठी सोय झाली आहे. पुन्हा प्रत्येक पादातील सूत्रे अंतर्गत विषयांनुसार वेगवेगळ्या अधिकरणात विभागण्यात आली आहेत. एका अधिकरणात किती सूत्रे असावीत याची संख्या निर्धारित नसते. ही विभागणी सिद्धांत समजावून घेण्यासाठी असल्यामुळे, आवश्यकतेनुसार कमीत कमी एक किंवा अधिक कितीही सूत्रे असू शकतात. विषय, संशय, संगती, पूर्वपक्ष आणि सिद्धांत हे पाच अवयव प्रत्येक अधिकरणात समाविष्ट होणे आवश्यक असते.

**विषयो विषयश्चैव पूर्वपक्षस्तथोत्तरः।**

**प्रयोजनं संगतिश्च शास्त्रेऽधिकरणं स्मृतम्।।**

अशा प्रकारे ही बांधणी अत्यंत तर्कनिष्ठ व शास्त्रशुद्ध पद्धतीने झालेली असल्यामुळे या ब्रह्मसूत्रांच्या माध्यमातून संपूर्ण वेदान्तविचार मनश्चक्षूंपुढे व्यवस्थितपणे उभा करता येतो. महर्षी वेदव्यासांचे हे रचना कौशल्य इतके विलक्षण आहे की ब्रह्मसूत्रांचा नीट अभ्यास करणाऱ्यास संपूर्ण उपनिषद् वाङ्मयात कोठेही परस्पर विरोध आढळून अडखळल्यासारखे होत नाही.

वरील व्याख्येनुसार स्वाभाविकपणे ही सूत्रे 'अल्पाक्षर' म्हणजे कमीत कमी अक्षरांची आहेत. पाठांतरासाठी सोपेपणा हा अल्पाक्षरत्वाचा एक लाभ असला तरी संस्कृत भाषेच्या व्याकरणाच्या बळावर सांप्रदायिक अभिनिवेशाने त्याच सूत्राचा भलताच वेगळा अर्थ करण्याचा प्रयत्न कोणी केल्यास त्यातून पुन्हा अडचण उभी राहण्याची शक्यता असते. भगवान् आदिशंकराचार्यांच्या आधी असे अनेकांनी केलेही पण या सूत्रांचा अर्थ विशद करण्यासाठी श्रीशंकराचार्यांनी जे भाष्य लिहिले ते इतके प्रभावी ठरले की त्यांच्या आधीची सगळी भाष्ये कायमची अस्तंगत झाली. या भाष्याला आपण जरी 'शांकरभाष्य' म्हणत असलो तरी स्वतः आचार्यांनी दिलेले नाव 'शारीरक भाष्य' असे

आहे.

'शारीरक' म्हणजे शरीरात निवास करणारे चैतन्य होय! ब्रह्मसूत्रांचा प्रतिपाद्य विषय शरीर अंतर्गत चैतन्य असून त्याच्या सुस्पष्ट ज्ञानासाठी लिहिले गेलेले भाष्य म्हणजे शारीरक भाष्य होय. 'शारीरकभाष्य' यातील शारीरक शब्दातील 'क' हा प्रत्यय 'कुत्सित' या अर्थाने आहे. कुत्सित शब्दाचा तुच्छ किंवा त्याज्य असाच अर्थ करण्याची आवश्यकता नाही. लहान किंवा गौण असाही त्याचा अर्थ आहे. बालक म्हणजे लहान मूल, बाल आणि बालक यामध्ये बालाच्या तुलनेत लहान असणारा तो बाल-क. तसेच चैतन्य आणि शरीर यांची तुलना केली असता शरीर गौण म्हणजे कमी महत्त्वाचे असून तदंतर्गत चैतन्याचे महत्त्व सर्वाधिक आहे. हे दाखवून देण्यासाठी प्रस्तुतचे भाष्य आहे असा याचा सरळ अर्थ आहे. देहात्मवादी चार्वाकाने शरीराची प्रधानता मानली. इतकेच नव्हे तर शरीर हेच सर्वस्व व त्याचे सुख हाच परमपुरुषार्थ मानला. यालाच भौतिकवाद म्हणतात. भौतिक देहाच्या पलीकडे अन्य कशाचेही महत्त्व न स्वीकारण्याची विचारधारा अन्य सर्व दार्शनिकांनी पूर्वपक्ष मानून तिचे खंडन केले आहे आणि देहातिरिक्त चैतन्याचा अंगीकार व त्याचे विभिन्न प्रकारे प्रतिपादन केले आहे.

भगवान शंकराचार्यांनी हे भाष्य लिहितांना अतिशय प्रखर तर्कनिष्ठा स्वीकारलेली आहे. याचा विलक्षण प्रत्यय म्हणजे ग्रंथारंभी मंगलाचरण करण्याचा पारंपरिक सर्वस्वीकृत प्रघात असूनही त्यांनी ब्रह्मसूत्र भाष्यारंभी कोठलेही मंगलाचरण अथवा देवतावंदन केलेले नाही. यातील त्यांचा भावच असा दिसतो की, ज्या परमतत्त्वाची सिद्धी मला या ग्रंथातून पुढे करावयाची आहे त्याचे अस्तित्व मंगलाचरणाच्या निमित्ताने आरंभीच मान्य करणे तर्कविरुद्ध ठरण्याची शक्यता असेल. वैदिक ग्रंथपरंपरेत ही गोष्ट मुलुखावेगळी मात्र खरी! आरंभीच्या मंगलाचरणाप्रमाणे त्यांनी भाष्याला 'शारीरक' असे दिलेले नाव सुद्धा आगळेच आहे. सृष्टीतील किंवा दृश्य सृष्टी पलीकडील वैकुंठादि लोकांतील ईश्वराची मीमांसा करण्याआधी, आपल्याला सर्वाधिक समीप असलेल्या देहांतर्गत चैतन्याची मीमांसा करता येणे प्राथमिक गरजेचे आहे, हे त्यांनी या नावाच्या निमित्ताने जणू लक्षात आणून दिले आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानामध्ये असे म्हणतात की 'सॉक्रेटिसने आभाळातील तत्त्वज्ञान जमिनीवर आणले.' त्याप्रमाणे आचार्यांनीही जणू अंतरिक्षातील तत्त्वमीमांसा मानवाच्या अंतरंगात आणून साोडली. श्रीज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीचे मंगलाचरण करतांना स्वसंवेद्य आत्मरूपाला नमन करून हेच साधले आहे ना!

आचार्यांचे हे शारीरक भाष्य, ब्रह्मसूत्रभाष्य किंवा शांकरभाष्य या नावाने लोकांना अधिक परिचित आहे. भारतीय तत्त्वज्ञानाची जगामध्ये सर्वाधिक ओळख व प्रतिष्ठा या ग्रंथामुळे होय! महर्षी वेदव्यासांनी ब्रह्मसूत्रांच्या माध्यमाने सुसंगतपणे मांडलेले उपनिषदातील तत्त्वज्ञान या शांकरभाष्यामध्ये बिनतोड युक्तिवादाने आणि धारदार तार्किकतेने सिद्ध केले गेले आहे. आचार्यांची प्रतिपक्षाचा पूर्वपक्ष उत्तम रीतीने मांडून त्याचे विलक्षण तर्ककौशल्याने खंडन करण्याची शैली खरोखरी अपूर्व होय. या

भाष्याच्या सुलभीकरणासाठी अद्वैत परंपरेत कितीतरी ग्रंथांचे लेखन झाले. कारण हे भाष्य म्हणजे अद्वैत तत्त्वज्ञानाचा सुदृढ पायाच होय! सुरेश्वराचार्यांची 'वार्तिक', वाचस्पति मिश्रांची 'भामती', पद्मपादाचार्यांची 'पञ्चपादिका', सर्वज्ञात्ममुनींचे 'संक्षेप शारीरक', आनंदगिरिंचा 'न्यायनिर्णय', अमलानंदांचा 'कल्पतरु', अप्पया दीक्षितांचे 'कल्पतरु परिमल' इत्यादि विपुल साहित्य अद्वैत परंपरेत निर्माण झाले. आचार्यांच्या भाष्याशी प्रत्यक्ष संबंधित असलेली ही अगदी मोजकी नावे आहेत. ही यादी कितीतरी वाढविता येईल आणि प्रत्यक्ष भाष्याव्यतिरिक्त अद्वैत प्रतिपादक ग्रंथांची मोजदाद करता येणेही फार कठीण कार्य होय. भगवान् आचार्यांना अत्यंत श्रेष्ठ विद्वान लेखकांचे पिढ्यान्‌पिढ्या अनुयायित्व प्राप्त झाले आणि या सर्वांनी आचार्यभाष्यापुढे नम्रतेने मान तुकविली यावरून या भाष्याची अद्वितीय थोरवी लक्षात यावी, म्हणून हा उल्लेख केला आहे.

ब्रह्मसूत्रे आणि शांकरभाष्य या दोन ग्रंथांवर निर्माण झालेल्या ग्रंथांपैकी ब्रह्मसूत्रावरील 'वैयासिक न्यायमाला' व भाष्यावरील 'संक्षेप शारीरक' या दोन ग्रंथांकडे माझा विशेष ओढा अध्ययनकाली असे. या दोन्ही ग्रंथांची तर्कशुद्ध प्रासादिक शैली कुणालाही भावेल अशीच आहे. श्रीशंकराचार्यांचे प्रत्यक्ष शिष्य व शृंगेरीच्या शारदापीठावरील प्रथम शंकराचार्य असे नैष्कर्म्यसिद्धिकार श्रीसुरेश्वराचार्य होत. सर्वज्ञात्ममुनि हे सुरेश्वराचार्यांचे शिष्योत्तम होत. 'नित्यबोधाचार्य' असेही त्यांचे अन्य एक नाव असून त्यांनी संक्षेप शारीरकाच्या आरंभी आपल्या गुरूंचे नाव 'देवेश्वर' असे मोठ्या आदराने उल्लेखिले आहे. 'सुर' शब्दाचा अर्थ 'देव' असा होत असल्यामुळे सुरेश्वर व देवेश्वर ही दोन्ही नावे एकाच विभूतीचा बोध करवितात याबद्दल शंका नसावी. पुढे हे थोर सर्वज्ञात्ममुनि कांची कामकोटि पीठावरील शंकराचार्य म्हणूनही आरूढ झाले. त्यांनी लिहिलेले तीन ग्रंथ म्हणजे 'संक्षेप शारीरक', 'पंचप्रक्रिया' आणि 'प्रमाणरक्षण' हे होत. यापैकी प्रस्तुत संक्षेप शारीरक हा ग्रंथ ब्रह्मसूत्र शांकरभाष्य यावरील असून, चार अध्यायात विभागलेल्या या ग्रंथात १२४० श्लोक आहेत.

आचार्यांच्या अप्रतिम भाष्यावर सर्वज्ञात्ममुनींनी अत्यंत प्रसन्न मनाने त्याच्या सुलभीकरणासाठी छंदोबद्ध 'संक्षेप शारीरक' या ग्रंथाची रचना केली असली, तरी हा प्रकरण ग्रंथ असल्यामुळे त्यातील सर्व विषय जसेच्या तसे यात आणलेले नाहीत. प्रकरण ग्रंथ म्हणजे विष्णुधर्मोत्तर पुराणानुसार -

**शास्त्रैकदेश-सम्बद्धं शास्त्र-कार्यान्तरे स्थितम्।**
**आहुः प्रकरणं नाम ग्रंथभेदं विपश्चितः।।**

म्हणजे कोठल्याही शास्त्रातील एखाद्या विशिष्ट पण विशेष आवश्यक अशा भागातील प्रतिपादनाचे, अधिक विस्ताराने विवेचन अथवा स्पष्टीकरण करणे होय. या व्याख्येनुसार या ग्रंथात मूळ ब्रह्मसूत्र भाष्यातील परपक्षखंडन किंवा उपासना आदि बाबींचा झालेला विस्तार टाळून केवळ निर्गुण ब्रह्माचे प्रतिपादन विस्ताराने केलेले आहे. 'हे कार्य करण्याची विशेष योग्यता मला सद्गुरूंची सेवा, सहवास व कृपा यातून लाभली आहे. सद्गुरूंच्या समीप त्यांची चरण सेवा इत्यादि निमित्ताने

जवळिकीची संधी मिळाली. या प्रसंगी वेदान्तशास्त्रविषयक विभिन्न पैलूंची चर्चा होत गेली. त्या प्रश्नोत्तरांतून मी अधिकाधिक निःशंक होत गेलो. त्यांच्या या कृपेने माझ्या मनो-बुद्धीतील सर्व अडसर दूर झाले. सद्गुरू व भगवंताच्या कृपेने सर्व विघ्ने दूर होतात याचा मला प्रत्यय आला. ग्रंथ लेखनासाठी आवश्यक व अनुकूल सर्व साधन-उपकरणांचीही सहज जुळवाजुळव होत गेली. त्यामुळे अगदी निःशंक व प्रसन्न मनाने मी हे लेखन करीत आहे', असे स्वतः लेखकाने म्हटले आहे. 'अज्ञानाचा परिहार करणारी निर्गुण ब्रह्मविद्याच यात मुख्यत्वे मी मांडीत आहे. ग्रंथाच्या नावात 'संक्षेप' हा शब्द घालण्याचे कारण असे की, मूळ भाष्यातील सगुण उपासनाविषयक विचार मांडायचा म्हटला तर ग्रंथाचा विस्तार फार लांबेल म्हणून तो विचार बाजूला ठेवून केवळ ब्रह्मविचार या ग्रंथात केला जात आहे' असे लेखकाने म्हटले आहे.

एकदा पूज्यपाद भगवान शंकराचार्यांनी आपल्या शिष्यांना वेदान्त ग्रंथ लेखनासाठी आज्ञा केली. त्यामुळे अनेक शिष्यांनी अनेक ग्रंथांची रचनाही केली. त्या ग्रंथांचे अवलोकन करून 'फार छान' असे म्हणून आचार्यांनी त्यांची प्रशंसाही केली. पण श्रीसर्वज्ञात्ममुनींनी लिहिलेला 'संक्षेप शारीरक' नावाचा ग्रंथ चाळून ते एकदम उद्गारले,

**सर्वानतिक्रम्य विराजते तु लोकोत्तरं हृद्यनिबन्धरत्नम्।**
**संक्षेपशारीरकनामधेयं सर्वज्ञनामा मुनिना प्रणीतम्।।**

'अरे, सर्व ग्रंथ चांगले असले तरी सर्वज्ञात्ममुनींनी लिहिलेला 'संक्षेपशारीरक' नावाचा हा ग्रंथ मात्र कुणालाही अत्यंत आवडेल असा अलौकिक प्रबंध होय!'

नंतर आचार्यांनी म्हटले, ''अहो, खरे तर या ग्रंथाला 'बृहत् शारीरक' असेच नाव शोभते.'' तेव्हा सर्वज्ञात्ममुनींनी विनयाने सांगितले, ''नाही नाही. आपल्या ग्रंथाचे नाव 'ब्रह्मसूत्र शारीरक भाष्य' असे असल्यामुळे माझ्या ग्रंथाचे नाव 'संक्षेप शारीरक' असे असणेच योग्य होय. सद्गुरूंच्या उल्लंघनाचे पातक मला लागू नये.'' तेव्हा आचार्यांनी आशीर्वाद दिला, 'तुमच्या या ग्रंथाला फार प्रतिष्ठा लाभेल' आणि तसेच घडत गेले. कदाचित हा प्रसंग आख्यायिकाही असेल पण काशीच्या विद्वान पंडितांमध्ये अशी आख्यायिकाही परंपरेने चालत येणे हे सुद्धा ग्रंथाच्या थोरवीवर प्रकाश टाकणारेच आहे. या सुंदर ग्रंथाला विद्वानांच्यामध्ये विपुल प्रतिष्ठा लाभली खरी! याचे वाचन आणि मनन अत्यंत फलदायी असल्याचा अनुभव तर कोणासही घेता येईल.

सर्वज्ञात्ममुनींच्या या 'सांक्षेपशारीरक' भाष्यावर नृसिंहाश्रमांची 'तत्त्वबोधिनी', मधुसूदन सरस्वतींची 'सारसंग्रह', पुरुषोत्तम दीक्षितांची 'सुबोधिनी' व रामतीर्थांची 'अन्वयार्थप्रकाशिका' इत्यादि अनेक टीका आहेत. यापैकी मध्ययुगीन विद्वत्शिरोमणी स्वामी मधुसूदनसरस्वती महाराज यांची 'सारसंग्रह' नावाची टीका गूढार्थ विवेचन करणारी, अत्यंत उत्कृष्ट आणि सर्वमान्य असून तिच्याच आधारे प्रस्तुत मराठी विवेचन सादर झालेले आहे. अद्वैत विचारधारेतील सर्वश्रेष्ठ विद्वानांच्या परंपरेत श्रीमधुसूदन सरस्वतींचे नाव अत्यंत उज्ज्वल होय. ते मूलतः कन्नौजचे निवासी असून फरीदपूर

जिल्ह्यातील पुनसिया गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे मूळ नाव कमलनयन असे होते. संन्यासानंतर त्यांचे नाव स्वामी मधुसूदन सरस्वती असे झाले आणि काशी क्षेत्रात त्यांचा निवास झाला. त्यांची अगाध विद्वत्ता सर्वमान्य होती याचे प्रत्यंतर खालील दोन प्रसिद्ध श्लोकांवरून येते.

**नवद्वीपे समायाते मधुसूदनवाक्पतौ। चकम्पे तर्कवागीशः कातरोऽभूद् गदाधरः।।**

**मधुसूदनसरस्वत्याः पारं वेत्ति सरस्वती। सरस्वत्याः परं पारं मधुसूदनसरस्वती।।**

यातील भावार्थ असा की, तत्कालीन न्याय दर्शनातील सर्वात थोर विद्वान श्री. मथुरानाथ तर्कवागीश आणि गदाधर भट्टाचार्य यांच्यासारखेही श्रीमधुसूदनसरस्वती यांचा सर्वोच्च अधिकार मान्य करीत आणि एकूण तत्त्वज्ञानाच्या सर्व शाखांवर त्यांचा असा अधिकार होता की, त्यांना ठाऊक नाही असा जणू कुठलाही विषय नव्हता. यामुळे तत्कालीन थोर विद्वान साहित्यिक संत गोस्वामी तुलसीदासजी यांनी आपला अजरामर ग्रंथ 'रामचरितमानस' अभिप्रायासाठी स्वामींकडे पाठविला होता. श्री मधुसूदनसरस्वतींच्या बावीस ग्रंथात्मक विशाल वाङ्मयातून १) वेदान्त कल्पलतिका, २) सिद्धांत कौमुदी, ३) भक्तिरसायन, ४) गीता गूढार्थ दीपिका, ५) अद्वैतसिद्धि या सुप्रसिद्ध ग्रंथांची नावे ऐकली तरी त्यांच्या प्रगाढ पांडित्याची काही कल्पना येऊ शकेल.

अशा या थोर अधिकारी विभूतीने प्रस्तुत संक्षेप शारीरकावर लिहिलेली 'सारसंग्रह' नावाची टीका वेदान्त वाचस्पति डॉ. श्री. द. देशमुख यांनी मराठी भाषिकांपर्यंत हा ग्रंथ पोचविण्यासाठी निवडून आपल्या उद्दिष्टांचे अर्धे मैदान जणू जिंकले. श्रद्धेय डॉक्टर काकांनी, त्यांनी आत्तापर्यंत केलेल्या वेदान्त सुलभीकरणाच्या आपल्या प्रचंड योगदानानंतर संक्षेप शारीरकावरील श्रीमधुसूदनसरस्वती यांच्या सारसंग्रह नामक टीकेचा भावार्थ मराठी भाषिक अभ्यासू साधकांपर्यंत पोहोचवून, स्वतः यशाचा मोठा पल्ला तर गाठला आहेच पण आपणासारख्या अभ्यासू साधकांनाही कायमचे ऋणाईत करून ठेवले आहे. या अत्यंत मोठ्या कार्यासाठी त्यांना द्यावेत तितके धन्यवाद थोडेच आहेत.

या ग्रंथाचे अवलोकन-वाचन करतांना माझ्या मनात मात्र एकदा एक प्रबळ विचार उसळला की, आधुनिक वाचकाला - तो साधक असला तरी - या व अशा अन्य ग्रंथांचे वाचन कितीसे करावेसे वाटेल! कुतूहलादाखल ग्रंथ चाळला तरी त्याचे वाचन त्याला कितपत झेपेल? आणि वाचले जाणार नसतील तर अशा थोर अभ्यासू महापुरुषांनी हा लेखन, प्रकाशन प्रपंच तरी कशासाठी करायचा? या विचाराने मी अंतर्मुख झालो. पण खुद्द आचार्यांनीच हे भाष्य कशासाठी लिहिले किंवा त्याची कारणे काही असतील तरी आधुनिक युवा पिढीतील वाचकांसाठी त्याची खरोखरी कितपत आवश्यकता आहे, या विचारांच्या प्रवाहात त्या थोर ग्रंथाच्या अंतरंगाचे चिंतन करण्यास प्रवृत्त झालो.

मनुष्य विचारप्रधान प्राणी आहे. नुसत्या इंद्रियसुखात गढून गेलेल्या पामर व बद्ध या श्रेणीतील लोकांकडे बघितले तरी एक गोष्ट तर जाणवते की यांनाही सुख हवे आहे. सत्ता, संपत्ती, कीर्ती,

विषयभोग वा अन्य प्रलोभनांमागे प्रायः जगातल्या सर्वांचीच धाव असली व त्यांच्या प्राप्तीसाठी दिवस-रात्र त्यांचे सतत चिंतन चालू असले तरी यालाही अपवाद आहे. सत्ता, संपत्ती, कीर्ती, विषयभोग अथवा अन्य प्रलोभने सहज उपलब्ध होण्याची शक्यता असतांनाही किंवा प्रसंगी समोर हात जोडून उभी असतांनाही त्यांचा अव्हेर करणारे मोजके का होईना काही महापुरुष आपणाला इतिहासात व विद्यमान समाजातही आढळतात. पण मला सुख नको असे म्हणणारा मात्र कुणीही आढळत नाही. प्रलोभनांमागे धावणारेही सुखासाठी धावतात व त्यांचा अव्हेर करणारेही सुखासाठीच करतात. फार काय, सन्मार्गाने चालून पुण्य कमावणारे सुखासाठीच तसे करतात व दुराचाराने पातकांच्या पथावर पुढे जाणारा सुखाचीच लालसा धरून असतो.

सुख आपणाला मिळत नाही असेही नाही. कमी-अधिक प्रमाणात सुख प्रत्येकालाच उपलब्ध होते. पण सुखाचा प्रवाह दुःखाच्या तडाख्याने पुनःपुन्हा खंडितही होत राहतो. नेमके हेच कोणाला भावत नाही. प्रत्येकाला मध्ये मध्ये न आटणारे अखंड सुख हवे असते. सुख किती प्रमाणात हवे असा प्रश्न जर एखाद्याला एकदम विचारला तर क्षणभर तो भांबावेल पण शेवटी त्याचे उत्तर असेच असणार की ते जास्तीत जास्त हवे. त्याला सीमाच नको. म्हणजे ते असीम असावे. प्रत्येकाचा असाही प्रयत्न असतो की माझ्या सुखावर अन्य कोणाचे नियंत्रण नसावे, ते पूर्णतः माझ्या स्वाधीन असावे. सामान्यतः असे अखंड, असीम व स्वाधीन सुख म्हणजेच आनंद होय! म्हणजेच प्रत्येकाची आंतरिक ओढ कळत नकळत त्या आनंदाकडे आहे आणि याला कुठलाही अपवाद नाही. तत्त्वज्ञानाच्या सर्व शाखांमध्ये या अखंड सुखाचाच मागोवा घेण्याचा प्रयत्न दिसतो. या अखंड आनंदाच्या प्राप्तीसाठी आपापल्या संस्कारांनुसार, क्षमतेनुसार व परंपरेनुसार विचारवंतांच्या प्रक्रिया व प्रमेये हे सर्व तत्त्वज्ञानाच्या प्रत्येक शाखेगणिक भिन्न असले तरी सर्वांचे गंतव्य मात्र दुःखाचा नाश व अखंड सुखप्राप्ती हेच आहे.

या दिशेने सोपानपरंपरेने न्याय, वैशेषिक, सांख्य, योग आणि पूर्वमीमांसा या दर्शन श्रेणीच्या शिखरस्थानी वेदान्तशास्त्र येते आणि या वेदान्तशास्त्राचा सर्वात महत्त्वाचा ग्रंथ ब्रह्मसूत्रांवरील शांकर भाष्य होय! वेदान्तशास्त्राच्या दृष्टीने ज्या आत्यंतिक सुखासाठी जीवाची निरंतर धडपड चालू आहे ते अंतरंगात असून खरे तर ते त्याचे स्वरूपच आहे. तो सुखरूपच असून त्याचे हे सुख स्वयंसिद्ध आहे. लोकमान्यांच्या चालीवर म्हणायचे तर, 'आनंद हा माझा स्वयंसिद्ध स्वभाव आहे.' ज्याप्रमाणे अग्नीची दाहकता व सूर्याचा प्रकाश त्यांचे स्वतःचेच स्वरूप आहे तसा माझ्या आतील खरा मी सुखस्वरूप असून हे माझे सुख वस्तू-काल-व्यक्तिनिरपेक्ष आहे. म्हणूनच या अखंड सुखाच्या प्राप्तीसाठी मला काही करण्याची आवश्यकता नाही. फक्त माझे स्वरूप कळण्याची आवश्यकता आहे. म्हणून उपनिषदांनी साधकांना सल्ला दिला '**आत्मानं विद्धि**' म्हणजे 'बाबा, स्वतःला जाणून घे रे!' इतकेच नव्हे तर बजावले, '**तमेव एकं जानथ आत्मानं, अन्या वाचो विमुञ्चथ।**' म्हणजे बाकी सर्व बडबड बंद करा, आधी त्या आत्मस्वरूपाला जाणून घ्या.

संपूर्ण ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाने सुद्धा शेवटी काय प्राप्त करून घ्यायचे असते तर माउलींच्याच भाषेत, '**आत्मा जेणें हस्तगत। रत्न होय।**' किंवा '**तेथ प्रियाची परमसीमा। तो भेटे माउली आत्मा।**'. एतावता, वेदान्तशास्त्राचा सर्व प्रवाह आत्मदर्शनाच्या सागराकडे घेऊन जाणारा आहे. ज्ञान म्हणजे आत्मज्ञानच! श्रीसमर्थांनी म्हटल्याप्रमाणे '**पाहावे आपणांसि आपण। या नांव ज्ञान।।**' पण एखादा अजाण आधुनिक युवक कदाचित याची खिल्लीही उडवील की हे काय, मी तर माझ्याकडे रोजच आरशात बघतो. मग हेच का ते ज्ञान? आणि नेमके येथूनच आचार्यांच्या प्रतिपादनाचा प्रवाह सुरू होतो. आरशात दिसते ते माझे शरीर. या शरीराला जाणणारा आणि त्याला 'मी' किंवा 'माझे' समजणारा अन्य कुणीतरी आहे. हे शरीर वेगळे आणि मी त्याहून वेगळा. या युष्मत् प्रत्यय व अस्मत् प्रत्यय येथून आरंभ होणारा आचार्य भाष्याचा धबधबा, आपल्या सर्व शंका कुशंकाना पाल्या-पाचोळ्यासारखे तर अन्य तत्त्वज्ञान शाखांतील पूर्वपक्षांना, कोलमडणाऱ्या मनोऱ्यांसारखे घेऊन, शेवटी आपल्याला नेऊन सोडतो तो आत्मज्ञानाच्या अथांग, शांत सागरापर्यंत! म्हणून आत्मज्ञानाच्या सिद्धी बद्दल मागे कधी निर्माण झालेल्या, आत्ता मनात घोळत असलेल्या व पुढे कधी उद्भवू शकणाऱ्या सर्व शंका कुशंकांना कायमचा विराम देऊन निःशंकपणे अध्यात्म मार्गावर म्हणजेच आत्मज्ञानाच्या वाटेवर अग्रेसर होण्यासाठी अनेक संदेहांनी भरलेल्या आधुनिक वातावरणात शांकरभाष्याचे अध्ययन हा सर्वात मोठा सुदृढ आधार होय.

ब्रह्मसूत्रांवरील हे अप्रतिम भाष्य लिहितांना जगद्गुरू आदि शंकराचार्यांनी प्रत्येक मुद्दा अत्यंत बारकाईने हाताळला आहे. आपण अत्यंत बुद्धिमान आहोत असा भ्रम असणाऱ्या कुठल्याही व्यक्तीने, निदान आपला हा स्वतःच्याच कुशाग्र बुद्धी विषयी असलेला भ्रम घालविण्यासाठी एकदा तरी हे शांकरभाष्य चाळावेच! म्हणजे आचार्यांच्या तलवारीहून तीक्ष्ण असलेल्या धारदार तर्क कौशल्याचा परिचय होऊन त्या प्रज्ञासूर्यापुढे आपोआपच मान लवेल. संपूर्ण परंपरेला अशी मान लवविण्यास भाग पाडणाऱ्या गद्य लेखनातील लालित्यामुळे प्रसन्न आणि सिद्धांताच्या खोलीमुळे गूढ, गंभीर असे 'प्रसन्न गंभीर' भाष्य लिहितांना आचार्यांनी सर्वप्रथम जीवाच्या बंधनाला कारण असलेल्या अज्ञानाचा म्हणजेच अध्यासाचा विचार केला. नंतर ब्रह्म विचारासाठी असलेले साधन चतुष्टय मांडले. नित्य, शुद्ध, बुद्ध ब्रह्मतत्त्व जगाच्या उत्पत्ती, स्थिती, लयाला कारण असून, ऋग्वेदादि सर्व ग्रंथांचे ते उत्पत्तिस्थान असल्यामुळे ते सर्वज्ञ आहे आणि सर्व वेद-वेदान्त वाक्यांचा अंतिम समन्वय या ब्रह्मतत्त्वातच आहे. मोक्ष हा नित्य स्वयंसिद्ध असून तो कर्माने नव्हे तर ज्ञानानेच अनुभवता येतो आणि ती अनुभूती सर्वोच्च परमानंदाची असते हे आचार्यांनी सिद्ध केले. इतर आचार्यांनी आनंदमय कोषालाच परमात्मा मानले पण शंकराचार्यांनी मात्र 'आनंदमय' हा कोषच असून परमानंदस्वरूप परमात्मा त्याच्याही पलीकडे असल्याचे प्रतिपादन केले. आत्मतत्त्व आणि जगत् हे ही सर्व, ब्रह्माहून अभिन्नच आहे. एक आत्मतत्त्वच ब्रह्मांड प्रपंच, आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक, ब्रह्मा-विष्णु-महेश इत्यादि असंख्य प्रचीतीच्या लाटा उसळत असलेला चैतन्यसागर होय. याचे ज्ञान

वेदान्तवाक्यांनीच शक्य आहे, याचे सुंदर प्रतिपादन आचार्यांनी केले आहे.

दुसऱ्या पादातील आठ अधिकरणातील बत्तीस सूत्रांचे स्पष्टीकरण करतांना उपनिषदातील विविध वाक्यांचा सर्वांगीण विचार करून ब्रह्मपरक अर्थच कसा योग्य व औचित्यपूर्ण आहे हे दाखवून दिले. पूर्वाचार्यांच्याही मतांचा परामर्श घेऊन यासाठी त्यांचीही मान्यता नोंदविली. हे करतांना केवळ सूत्रांचा अनुवाद न करता जणू सूत्रांतील शब्दांमागचे भगवान व्यासांचे हृदयच त्यांनी प्रकट केले आहे. तृतीय पादातील चौदा अधिकरणांतर्गत त्रेचाळीस सूत्रांच्या भाष्यात परमात्मा स्वर्गादिकांचा आधार आहे; भूमा म्हणजे मोठेपणा, व्यापकता, तेही ब्रह्मच आहे. अक्षर म्हणजे ब्रह्म. ध्यानाचा विषय, दहर म्हणजे सूक्ष्म आकाश, सर्वांचा प्रकाशक, अंगुष्ठमात्र पुरुष, प्राण, ज्योति व आत्मा ही सर्व वर्णने ब्रह्माचीच होत. परमात्मा हाच आद्यकारण, एकमेवाद्वितीय व सर्वव्यापी आहे आणि सर्वांना या ज्ञानप्राप्तीचा अधिकार आहे. हा विषय आचार्यांनी सुंदरपणे मांडला आहे. चतुर्थ पादातील आठ अधिकरणातील अठ्ठावीस सूत्रांवर भाष्य करतांना उपनिषदातील अव्यक्त पदाचा अर्थ 'सूक्ष्म शरीर' असा होत असून सांख्यांनी म्हटल्याप्रमाणे प्रधान किंवा त्रिगुणात्मक प्रकृती हा त्याचा अर्थ नाही. इतर श्रुतींप्रमाणे अजामंत्राचे तात्पर्य ब्रह्मच आहे. जगाचे कारण भावरूप सत्तत्त्व असून बृहदारण्यक उपनिषदातील याज्ञवल्क्यमैत्रेयी संवादात आलेल्या '**न वा अरे...**' या सुप्रसिद्ध वाक्याचे तात्पर्य परमात्माच होय हे त्यांनी सिद्ध केले. ब्रह्म जगाचे उपादन कारण व निमित्तकारणही आहे. सर्व श्रुतिवाक्यांचे तात्पर्य ब्रह्म हेच आहे हे आचार्यांनी या अध्यायात ठासून सिद्ध केले. वैशेषिक आणि इतर तार्किकांच्या तत्त्वज्ञानातील तत्त्वे श्रुतींचे अंतिम तात्पर्य नव्हे हे आचार्यांनी समर्थ युक्तिवादाने सिद्ध केले.

दुसऱ्या अध्यायाचा पहिला पाद 'स्मृतिपाद' म्हणून ओळखला जातो. यात मुख्यतः सांख्य, योग, मीमांसा, न्याय, वैशेषिक या दर्शन शास्त्रकारांनी ज्या स्मृतींचा उल्लेख करून वेदांचा अद्वैत तत्त्वज्ञानाशी विरोध दाखविला आहे, त्या सर्वांचा विरोधपरिहार करून सर्व औपनिषदिक वाक्यांचे सरतेशेवटी अद्वैत वेदान्तातच पर्यवसन होते हे आचार्यांनी कौशल्याने सिद्ध केले. या पादामध्ये तीन अधिकरणे आणि सदतीस सूत्रे आहेत. दुसऱ्या पादाचे रूढ नाव 'तर्कपाद' होय. यात आठ अधिकरणांच्या मधून पंचेचाळीस सूत्रांचे भाष्य आहे. सांख्यदर्शन, योगदर्शन, कणादांचे वैशेषिक दर्शन, बौद्ध विचारधारा, जैन विचारधारा आणि पांचरात्र भक्तिविचारातील वेदविरोधी अंशाचे खंडन करून आचार्यांनी खंडन पद्धतीचाही आदर्श जणू उपस्थित केला आहे. प्रत्येक अधिकरणात आधी पूर्वपक्षाची प्रभावी मांडणी करून, तितक्याच प्रभावीपणे उत्तरपक्षात जसे आचार्य खंडन करतात ते बघून थक्क व्हायला होते. सर्व बौद्धिक प्रतिपक्षीयांचा कुशल तर्काने बीमोड करून सृष्ट्युत्पत्तीसाठी आवश्यक सर्वज्ञत्व, सर्वशक्तिमत्व इत्यादि सर्व धर्म ब्रह्माच्या ठिकाणी असल्यामुळे हे ब्रह्मच जगत्कारण होय हे आचार्यांनी ठामपणे सिद्ध केले. यानंतरच्या तृतीय पादात पंचमहाभूते आणि जीवादि श्रुतींच्यामध्ये दिसणाऱ्या विरोधाचा परिहार, तर चतुर्थपादामध्ये लिंगशरीरविषयक वैदिक

वाक्यांमध्ये दिसणाऱ्या विरोधाचा परिहार करून, संपूर्ण सृष्टीचा कर्ता एकमात्र ईश्वर होय हे प्रमाणित केले.

तिसऱ्या साधन अध्यायातील पहिल्या पादात जीवाची संसारगती, अगती यांचा विचार आणि वैराग्य निरूपण केले आहे, तर दुसऱ्या पादात तत् पदार्थाचे आणि त्वम् पदार्थाचे निरूपण केले आहे. तिसऱ्या पादात ब्रह्मज्ञानोपयोगी पराविद्या आणि अपराविद्या यांच्या गुणांचे विस्ताराने प्रतिपादन आणि चौथ्या पादात निर्गुण ब्रह्मविद्येचे अंतरंग आणि बहिरंग दर्शन घडविले आहे.

'फलाध्याय' नावाच्या चौथ्या अध्यायातील पहिल्या पादात जीवन्मुक्तीचे निरूपण, दुसऱ्या पादात जीवाच्या उत्क्रांती आणि गतीचे निरूपण केले आहे. तृतीय पादामध्ये सगुण उपासना करणाऱ्यांना प्राप्त होणाऱ्या परलोकमार्गाचे विवरण दिले असून चौथ्या पादात ब्रह्मप्राप्ती आणि ब्रह्मलोकाच्या स्थितीचे निरूपण आहे. संपूर्ण ब्रह्मसूत्र शांकरभाष्याचा हा धावता आढावा आहे. तो येथे सांगण्याचे मुख्य कारण हे की, अध्यात्मशास्त्राचा किती व्यापक आणि सखोल विचार या ग्रंथात केला गेला आहे याचे ओझरते दर्शन वाचकास व्हावे व त्यास ब्रह्मविचाराकडे वळावेसे वाटावे.

विश्वाची उत्पत्ती, स्थिती, लय ही कार्ये ज्या परमशक्तीने संपादित होतात ते परब्रह्म तत्त्वच माझे मूळ अधिष्ठान स्वरूप आहे हा विचार सामान्य जनांना अथवा भाविकांना लगेच गळी न उतरला तरी वेदान्तशास्त्राचे ते ठाम प्रतिपादन आहे. किंबहुना सर्व वेदान्त वाक्यांचे म्हणजे उपनिषदातील विचारांचे अंतिम पर्यवसान परब्रह्माच्या प्रतिपादनातच होते. या एका तत्त्वाच्या ज्ञानाने सर्व काही जाणले जाते आणि या एका तत्त्वाच्या ज्ञानाच्या अभावी जीवन दुःखमय होते. या ज्ञानाशिवाय दुःखातून मुक्ती नाही. '**ऋते ज्ञानात् न मोक्षः**' हा वेदान्ताचा सिद्धांत आहे. जीवाच्या सर्व दुःखांचे कारण केवळ स्वरूपाचे अज्ञान होय! स्वरूपाचे ज्ञान होताच, म्हणजे ब्रह्मज्ञान होताच सर्व दुःखांपासून कायमची सुटका होते. वस्तुतः जीव हा स्वभावतःच ब्रह्मरूप असल्याने तो नित्य, शुद्ध, बुद्ध, मुक्त स्वरूप आहे. त्यामुळे मोक्ष म्हणजे काही नवीन निर्माण करायची किंवा कोठेतरी जाऊन मिळवावयाची गोष्ट नाही. मी मुळात ब्रह्मस्वरूप आहे, याची अनुभूती होण्याचीच केवळ आवश्यकता आहे.

भगवान आदि शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाबद्दल अनेक वेळा, किंबहुना उठसूट 'ते मायावादी असून जगास मिथ्या मानतात आणि त्यामुळे सामान्य लोक निराशावादी होऊन भौतिक उन्नतीकडे पाठ फिरवितात' असा आक्षेप घेण्यात येतो. असा आक्षेप घेणारे आचार्यांचा सिद्धांत न समजल्यामुळे अज्ञानाने तो घेतात तेव्हा त्यांची कीव करावीशी वाटते. पण सांप्रदायिक किंवा वैचारिक अभिनिवेशानेही अनेकदा असा आरोप खोडसाळपणे करण्यात येतो. थोर पंडित स्व. द. वा. जोग यांनी म्हटल्याप्रमाणे वस्तुतः अद्वैत वेदान्त हे ब्रह्मवादी तत्त्वज्ञान आहे. जीव आणि जगत् यांच्या मुळाशी ब्रह्म हेच अधिष्ठानरूपाने आहे. ब्रह्म हे अंतिम सत्य आहे. परमार्थतः ब्रह्माशिवाय काहीच नाही. व्यवहारदशेत मात्र सर्वत्र भेद आणि द्वैत आहे. द्वैताच्या प्रांतात आपली सुख आणि आनंद

यांच्या प्राप्तीची धडपड सारखी चाललेली असते. आपण अपूर्ण आहोत, दुःखी आहोत असा आपल्याला प्रत्यक्ष अनुभव येत असतो. ही अपूर्णता आणि हे दुःख कशामुळे जाईल याची आपण चिंता करतो. देह, मन, बुद्धी यांचे ममत्व असल्यामुळे त्यांच्यापासून सुखाची प्राप्ती करून घेण्याचा आपण प्रयत्न करतो. काही वेळ आपण त्यात रमतो आणि आपल्या प्रयत्नास तात्पुरते यशही येते. परंतु कालांतराने पुनः असमाधान निर्माण होते. असे असमाधान वाटण्याचे कारण आपण चिरंतनस्वरूपाचा आनंद मिळविलेला नसतो. हा आनंद आपल्या खऱ्या स्वरूपाच्या अनुभूतीतच शक्य आहे. आत्मा हेच आपले खरे स्वरूप आहे म्हणून देह, मन, बुद्धी यांचा क्रमशः निरास करून आत्मानुभूतीत राहणे हा जीवाचा अंतिम पुरुषार्थ आहे.

अनादि काळापासून - असंख्य जन्मांपर्यंत ज्या अज्ञानामुळे ही दुःख परंपरा जीवाला छळत राहिली ती पुन्हा कधीच उद्भवणार नाही अशी पूर्णपणे नष्ट करावयाची असेल तर त्यासाठी आपणही तशीच तयारी करायला नको का? आज गल्लीत गोट्या खेळणाऱ्या मुलाला ऑलिंपिक स्पर्धेत भाग घेऊन सुवर्णपदक पटकावयाचे असेल तर त्याला त्यासाठी कसून पद्धतशीर मेहनत करावयास हवी. हे जर आपणास सहजपणे पटते तर आजन्मच नव्हे तर अनेक जन्मांपासून पुनःपुन्हा दुःखग्रस्त होणाऱ्या जीवाला कैवल्य साम्राज्यापर्यंत पोहोचण्यासाठी किती तरी तयारी करायला हवी हे आपणास सहज पटायला हवे.

महत्त्वाच्या मोठ्या प्रवासासाठी जशी अनेक आवश्यक वस्तूंची आपण जुळवाजुळव करतो तसे मोक्षमार्गाच्या पथिकाला काही गुणसंपदा अंगी बाणवणे अनिवार्य ठरते. यातील पहिली गोष्ट अविनाशी ब्रह्मतत्त्वाच्या अनुभूतीसाठी निरंतर नाश पावणाऱ्या जगातील वस्तूंना गौणत्व देणे व आवश्यकतेपुरताच त्यांचा उपयोग करणे, हा नित्य-अनित्य-वस्तु-विवेक! हा विवेक नुसता ज्ञानाच्या पातळीवर असून चालत नाही तर तो आचरणाच्या पातळीवरही वैराग्यरूपाने यावा लागतो. म्हणजे या जगातील व परलोकातीलही नाशवंत विषयांच्या सुखाची आसक्ती विसर्जित व्हावी लागते. काम, क्रोधादि षड्विकार मनाला अशांत करतात. त्यांना रजा देणे म्हणजे 'शम' होय! प्रसंगी मनात असे काही उद्भवले तरी त्याचा प्रभाव इंद्रियांपर्यंत न पोहोचू देणे असा इंद्रियनिग्रह म्हणजे 'दम' होय. जगातील अनेक अनावश्यक उठाठेवी व सकाम कर्मकांडाचा पसारा यांना विराम देणे म्हणजे 'उपरति' होय. प्रारब्धानुसार प्राप्त झालेल्या दुःखास शांतपणे सहन करणे म्हणजे 'तितिक्षा' होय. वेद, शास्त्र आणि सद्गुरू यांच्या अनुसरणाने माझे कल्याणच होईल अशी तीव्र भावना म्हणजे 'श्रद्धा' होय आणि साधनेच्या मार्गाला लागल्यावरही विविध सिद्धी, चमत्कार याबद्दल चित्तात संकल्प-विकल्प न उसळणे म्हणजे समाधान होय. याला वेदान्त शास्त्राने 'शमादि षट्संपत्ती' असे म्हटले आहे.

वस्तुतः ही षट्संपत्ती म्हणजे सहा साधने नसून 'शांति' या एका साधनाचे स्थान आणि कालपरत्वे सहा भेद सांगितलेले दिसतात. शांती मनात असेल तेव्हा शम, इंद्रियात असेल तेव्हा दम, ती कर्मात असेल तेव्हा उपरती, शरीरात असेल तेव्हा तितिक्षा, हृदयात असेल तेव्हा श्रद्धा आणि

चित्तात असेल तेव्हा समाधान होय. अशा प्रकारे काही प्रमाणात तरी शांत झाल्याशिवाय कठीण ग्रंथांचा अभ्यास किंवा वैज्ञानिकांना संशोधनही करता येत नाही, मग सर्वोच्च ध्येय ब्रह्मानुभूतीसाठी तर याची नितांत अनिवार्यता कोणाच्याही लक्षात येईल. शेवटचे आणि सर्वात मूलभूत असलेले साधन म्हणजे मुमुक्षा होय. मी अज्ञानाच्या बंधनात आहे हे कळणे व त्यापासून सुटण्याची तीव्र इच्छा निर्माण होणे याच्या अभावी साधन मार्गावर पहिलेही पाऊल पडेलच कशाला? म्हणून संसारदुःख बंधनांतून सुटण्याची तीव्र इच्छा ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. भगवान बुद्धांना साधन नंतर कळले व वळले पण रोग, वार्धक्य व मृत्यूच्या दुःखातून स्वतःलाच स्वतःची सुटका करण्याची तीव्र इच्छा झाल्याने त्यांचे अभिनिष्क्रमण घडले. या मुमुक्षेचे जितके प्रमाण आपल्याकडे असेल तितक्या वेगाने साधन घडेल हे सत्य होय! वरील विवेचनाला शास्त्राच्या भाषेत 'साधन चतुष्टय' असे म्हणतात. मोक्ष मार्गाचे पथिक होतांना हे पाथेय अनिवार्य होय.

**नाविरतो दुश्चरितान्नाशांतो नासमाहितः।**
**नाशान्तमानसो वाऽपि प्रज्ञानेनैनमाप्नुयात्।।**

या कठोपनिषद् मंत्रात ऋषींनी स्पष्ट म्हटले आहे की, ग्रंथांच्या वाचनाने आणि शास्त्रांच्या परिशीलनाने बौद्धिक पातळीवर कितीही ज्ञानाचा संचय केला तरी उपरोक्त साधनसंपदेने जोपर्यंत योग्य व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण होत नाही तोपर्यंत त्या परमतत्त्वाची अनुभूती कोणालाही येणे शक्य नाही. ग्रंथालयात उदंड वाचन करून गेलेल्या अभ्यासाने महान विद्वान होता येईल, महाराजही म्हणवून घेता येईल पण केवळ तेवढ्याने मुक्त होता येत नाही.

आयुष्यभर खूप श्रवण करून आणि बरेचसे वाचन करूनही आपणास खरोखरी स्वरूपबोध का होत नाही असे ज्यांना वाटते, त्यांच्यासाठी एक पारंपरिक कथा बोलकी ठरेल.

प्राचीन काळी एक राजा होता. त्याच्याजवळ असलेल्या मंत्रीगणांमध्ये भच्छू नावाचा मंत्री आपल्या चातुर्याने व अन्य सद्गुणांनी राजाला अत्यंत प्रिय होता. त्याचा मत्सर करणाऱ्या अन्य मंत्र्यांनी त्याच्याविरुद्ध एक कट रचला व सांगितले की 'राज्याच्या अतिदूर आणि दुर्गम भागात शत्रूंनी भीषण आक्रमण केले आहे आणि त्याचा बीमोड चतुर व पराक्रमी भच्छू खेरीज कोणी करू शकेल असे वाटत नाही.' यामुळे सेनेचे नेतृत्व देऊन राजाने भच्छूला युद्धासाठी पाठविले. तिकडे दुष्ट मंत्र्यांनी भच्छूला ठार मारण्याचा कट केला व हे लक्षात आल्याने प्राणभयाने भच्छू वनात पळून गेला. इकडे अमात्यांनी येऊन भच्छू युद्धात मरण पावल्याचे राजाला सांगितले. तिकडे भच्छू अंगाला राख फासून तप करू लागला. योगायोगाने ही गोष्ट एका चलाख मंत्र्याच्या लक्षात आली. म्हणून आपली लबाडी उघडकीस येऊन आपणास राजदंड होऊ नये यासाठी, मेलेला भच्छू भूत होऊन वनात राहतो आहे आणि कोणासही भेटणाऱ्याला झपाटतो आहे असे राजाला भरवून दिले. योगायोगाने एकदा शिकारीस गेलेल्या राजाने दाढी-जटा वाढविलेल्या भच्छूस पाहिले. अत्यंत भेदरून तो 'वाचवा, वाचवा' म्हणत माघारी धावला आणि राजमहालात आल्यावरही तापाने

फणफणून पडला. या कथेचा उल्लेख मुनींनी विषय समजावण्यासाठी चपखलपणे केला आहे. भच्छूवर राजाचे प्रेम असून व दाढी जटा वाढलेली, समोर असलेली व्यक्ती तोच भच्छू असूनही दुष्ट अमात्यांनी भरवून दिल्यामुळे राजा त्याला ओळखू शकला नाही. तसेच तो भच्छू असेल असे त्याला पटलेही नाही. कालांतराने वेषांतर करून गेलेल्या चतुर भच्छूने ही गोष्ट राजाला सांगितली आणि पटवूनही दिली. राजाला खूप आनंद झाला. आपले शुद्ध स्वरूप सच्चिदानंद असतांनाही व त्याचेसाठीच आपण प्रयत्नशील असूनही जन्मोजन्मींच्या कुसंस्काराने आणि विषयी लोकांच्या कुसंगतीने पुन्हा पुन्हा वेदान्तश्रवण करूनही बुद्धीच्या मालिन्यामुळे देहबुद्धी जात नाही आणि आत्मबुद्धी उत्पन्न होत नाही. संसाराची सत्यता व सुखरूपता तसेच जीव ईश्वराच्या भेदांविषयीचा हा परिणाम होय. जीवाला ही आत्मबुद्धी प्रदान करण्यासाठीच वेदान्तशास्त्र आहे.

या कथेत प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहून सुद्धा राजाचा भ्रम गेला नाही. कारण त्याच्या मनात भच्छू ब्रह्मराक्षस झाल्याचा संस्कार खोल रुजला होता. भच्छू डोळ्यांनी प्रत्यक्षच दिसला पण सुदृढ गैरसमजाने प्रत्यक्ष बघण्यावरही मात केली. आपल्यालाही असाच झालेला भ्रम म्हणजे असंभावना व विपरीत भावना घालविण्यासाठी शास्त्र व सद्गुरू यांची आवश्यकता आहे. याच प्रकारे तत्त्वमसि इत्यादि महावाक्यांनी पूर्ण ब्रह्मसाक्षात्कारच होतो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी म्हटल्याप्रमाणे, '**काना वचनाचियें भेटीं।**' हे ज्ञान तत्काळ होते व हे ज्ञान पूर्णच असते. त्यामुळे 'संक्षेप शारीरक'कारांचे म्हणणे असे की, मनन किंवा निदिध्यासन यांच्या अभावीही महावाक्य उपदेशाने ब्रह्म साक्षात्कार होतोच पण प्रतिबंधक कारणे म्हणजे असंभावना व विपरीत भावना यांच्यामुळे तो मोक्षपर्यवसायी ठरत नाही. यासाठी मनन व निदिध्यासनही गौण म्हणून उपयोगी आहेतच पण मुख्य उपयोग शब्दप्रामाण्याचा म्हणजे वेदातील तत्त्वमसि इत्यादि महावाक्यांच्या उपदेशाचाच होय! अशा प्रकारचे विवेचन केवळ संक्षेपशारीरककारांनीच केले आहे.

सर्वात मोठा प्रश्न असा आहे की, सच्चिदानंदरूप ब्रह्मतत्त्वच जर जीवाचे मूळ स्वरूप असेल तर हा जीव प्रत्यही अनुभवाला येणाऱ्या सुख-दुःखांच्या कचाट्यात का सापडला आहे? या प्रश्नाचे एकमात्र उत्तर 'स्वरूपाचे अज्ञान हेच जीवाच्या दुःखाचे कारण आहे' हे होय. मंद प्रकाशात पडलेला दोरखंड बघून तो सर्प आहे असे वाटले की लगेच भीती वाटते, थरथर कापायलाही होते, भ्यायलेली व्यक्ती पळूही लागते, प्रसंगी घाम फुटतो पण नंतर दिव्याच्या प्रकाशात तो सर्प नसून केवळ दोरखंड होता हे कळल्यावर भयकंपादि दोष तर जातातच पण 'कसा मला भ्रम झाला' याचे स्वतःला आश्चर्यही वाटते. सच्चिदानंद तत्त्वाच्या अधिष्ठानावर सुख-दुःखरूप जड जगताचा जीवाला भ्रम झाल्यामुळे म्हणजे जगत् हे ब्रह्म या अधिष्ठानावर भ्रमाने भासल्यामुळे, अखंड सुख-दुःखांच्या मालिकेच जीव अडकला. या रज्जुसर्पाच्या उदाहरणाप्रमाणे आचार्यांनी जागोजागी 'शुक्तिका-रजत' म्हणजे शिंपल्याच्या चकाकण्यामुळे होणारा चांदीचा भास, 'मरु-मरीचिका' म्हणजे वाळवंटात होणारा मृगजळाचा भास व 'गगनमालिन्य' म्हणजे निर्लेप आकाशात ढग, धूर किंवा धूळ यामुळे

होणारा मलीनतेचा म्हणजे काळपटपणा अथवा निळेपणाचा आभास इत्यादि अनेक दृष्टांत देऊन हा होणारा भ्रम मूळ अधिष्ठानाचे ज्ञान न होण्याचाच केवळ परिणाम आहे याचे प्रतिपादन केले आहे.

अधिष्ठानाच्या अज्ञानामुळे निर्माण होणाऱ्या भ्रमाला त्यांनी 'अध्यास' असे चपखल नाव दिले आहे. डोळ्यास कांचबिंदू आदि दोष असल्यामुळे किंवा दिसणारा पदार्थ फार दूर किंवा अंतरावर असल्यामुळे अथवा बघणाऱ्याच्या मनात लोभ, मोह, भय इत्यादि विकार असल्यामुळे पदार्थाचे यथार्थ ज्ञान होत नाही. अशा प्रकारे **'दोषादि त्रय जन्यत्वम्'** हे अध्यासाचे म्हणजे भ्रमाचे तटस्थलक्षण तर **'स्मृतिरूपः परत्र पूर्वदृष्टावभासः'** हे अध्यासाचे स्वरूपलक्षण होय. आधी केव्हातरी पाहिलेला सर्प दोरीवर भासणे किंवा पूर्वज्ञात चांदी चकाकणाऱ्या शिंपल्यावर भासणे ही स्वरूपलक्षणाची उदाहरणे आहेत. अशा भ्रमात वस्तू केव्हातरी अनुभवलेली असावी लागते व भ्रमकाली ती समोर उपस्थित नसते. अशा प्रकारच्या अज्ञानाची म्हणजे अविद्येची निवृत्ती होताच केवळ एका ब्रह्मवस्तूचे – आत्मस्वरूपाचे ज्ञान झाल्यामुळे अशा सिद्ध ज्ञानी पुरुषांसाठी जग मिथ्या ठरते.

एकमात्र सच्चिदानंदस्वरूप परब्रह्मावर जीवाला जी 'जीव' म्हणून प्रचिती होते ती कशी होते याचे विवेचन करतांना वेदान्तात तीन वाद (विचार प्रवाह) निर्माण झाले. भाष्याचे भामती टीकाकार वाचस्पति मिश्र यांच्या विचार प्रणालीला 'अवच्छेदवाद' म्हणतात. नैष्कर्म्यसिद्धिकार सुरेश्वराचार्य यांनी 'आभासवाद' सांगितला आणि संक्षेप शारीरककार सर्वज्ञात्ममुनी यांनी 'बिंबप्रतिबिंबवाद' प्रतिपादन केला. म्हणून म्हणतात –

**वाचस्पतेरवच्छेद आभासो वार्तिकस्य च। संक्षेपशारीरककृतां प्रतिबिम्बमिहेष्यते।।**

या श्लोकात हे चपखलपणे मांडले आहे. पद्मपादाचार्यांनी लिहिलेल्या पंचपादिकेवर टीका लिहिणाऱ्या विवरणकारांचेही हेच मत आहे.

जाता जाता हे ही सांगून टाकले पाहिजे की वेदान्तात दोन प्रस्थाने प्रसिद्ध आहेत. एक भामती प्रस्थान आणि दुसरे विवरण प्रस्थान होय. प्रस्थान म्हणजे अपेक्षित वस्तूच्या प्राप्तीसाठी किंवा विजयासाठी आगेकूच करण्याचा आरंभ करणे. अशी आगेकूच करण्यासाठी उपयोगी पडणारे साधन सुद्धा प्रस्थान म्हणविले जाते. मोक्ष ही सर्वांची अपेक्षित वस्तू आहेच व साधन संग्रामातील तो विजयही आहे. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि भगवद्गीता यांना मोक्षप्राप्तीची साधने या दृष्टीने प्रस्थानत्रयी म्हणतात. शांकरभाष्यासहित ब्रह्मसूत्रे प्रस्थानच होत. भामती व विवरण या टीका असल्या तरी त्यांच्या विचारसरणीत थोडे अंतर असल्यामुळे त्यांना भाष्यांच्या अंतर्गत दोन प्रस्थाने म्हणून ओळखले गेले. प्रस्तुत ग्रंथ 'संक्षेप शारीरक' यांनी एकाच प्रस्थानात अडकून न पडता या दोन्ही प्रस्थानांचे अनुसरण केले. जेथून जे ग्राह्य वाटले ते स्वीकारले आणि काही ठिकाणी स्वतंत्रपणे अर्थ लावला. भाष्यातील वाक्यांचा अर्थ लावत असतांना असे स्वातंत्र्य घेणे हे अभिनंदनीय साहस होय. काही ठिकाणी सर्वज्ञात्ममुनींनी ते केले आहे. काही विद्वानांच्या मते 'संक्षेप शारीरका'ला स्वतंत्र

प्रस्थानही म्हणता येईल. पण अशी स्वतंत्र मतप्रणाली मोजक्याच जागी असल्यामुळे वेदान्त परंपरेत हे स्वतंत्र प्रस्थान ठरले नाही.

शुद्ध चैतन्याचा जीवाशी कसा संबंध आहे याचे विवेचन करतांना स्वतः भाष्यकारांनी अवच्छेदवाद, आभासवाद किंवा बिंबप्रतिबिंबवाद यातील कोणत्याही एका वादाचा उल्लेख केला नाही. पण त्यांच्या विवेचनाचा आणि त्यांनी दिलेल्या दृष्टांतांचा मागोवा घेत, नंतरच्या विद्वानांनी या सूक्ष्म विषयाचे प्रतिपादन आपापल्या मतांनुसार बारकाईने केले आहे आणि यातूनच आपोआप या तीन प्रस्थानांच्या धारा प्रवाहित झाल्या. जीवस्वरूपाचा विचार करतेवेळी सर्वव्यापक चैतन्याला संकोचित म्हणजे अवच्छेद करणारी केवळ वृत्ती आहे असे मानणे म्हणजे अवच्छेदवाद ( ) होय. या मतात मायाविशिष्टचैतन्यास ईश्वर व अविद्याविशिष्टचैतन्यास जीव म्हटले जाते, तर सर्वव्यापक चैतन्याला अवच्छेदक केवळ वृत्तीच आहे असे न मानता त्या वृत्तीत आभास आहे असे मानून ती साभास वृत्ती जीवभावाची अवच्छेदक आहे असे मानणे म्हणजे आभासवाद ( ) होय. अज्ञानरूप उपाधीच्या संबंधाने असंग, अद्वितीय सर्वव्यापक चैतन्याचे जागी, बिंबस्थानी ईश्वरभाव व प्रतिबिंबस्थानी जीवभावाची प्रतीति मानतात यास बिंबप्रतिबिंबवाद ( ) असे मानतात. या मतात बिंब-प्रतिबिंब स्वरूपाने सत्य असून बिंबत्व, प्रतिबिंबत्व हे धर्म मिथ्या मानले जातात.

विवरणकार प्रकाशात्मा व संक्षेपशारीरककार सर्वज्ञात्ममुनी प्रतिबिंबवादी आहेत. त्यांच्या मते जीव हा चैतन्याचा प्रतिबिंबरूप आहे. आरशात आपले मुख दिसते ते बिंबरूप मुखाहून भिन्न नसते तसेच ते मुख आरशात आधीच होते असेही म्हणता येत नाही. बिंबाशिवाय त्याला स्वतंत्र अस्तित्व नाही तरी त्याला मिथ्या म्हणता येत नाही कारण बिंबरूपाने ते सत्य आहेच! म्हणून अशी शक्ती मानण्याची आवश्यकता आहे की ज्यामुळे तो आरसा, सत्य असलेले बिंब आपल्या आतून वेगळेपणाने भासवू शकतो. वस्तुतः चिदात्मा एकच आहे पण प्रत्येक शरीरामध्ये भिन्न भिन्न बुद्धी म्हणजे अन्तःकरण असल्यामुळे त्या त्या ठिकाणी पडलेली प्रतिबिंबे भिन्नपणाने भासतात. पौर्णिमेच्या रात्री वेगवेगळ्या अनेक जलाशयांमध्ये पडलेली चंद्राची प्रतिबिंबे असंख्य असली तरी या सर्व प्रतिबिंबाचे मूळबिंब असलेला चंद्र मात्र एकच असतो. तसे भिन्न भिन्न देहांमध्ये विद्यमान अन्तःकरणात एकमेवाद्वितीय जीवरूपाने पडलेली प्रतिबिंबे असंख्य असली तरी या सर्वांचे बिंबरूप परमात्मचैतन्य केवळ एकच होय.

ब्रह्मसूत्रशांकरभाष्याचा अभ्यास वैज्ञानिक युगातील आधुनिक सुशिक्षितांना काय उपयोगाचा असा विचार जर कुणाच्या मनात येत असेल तर त्याच्या या शिक्षणजन्य अज्ञानाहंकाराची कीव करायला हवी. यापुढे या ग्रंथाची आवश्यकता अधिकाधिक वाढणार आहे कारण विज्ञानालाच आता पुढील पाऊल टाकण्यासाठी भारतीय वेदान्ताकडे वळण्याची आवश्यकता जाणवू लागली आहे. पदार्थविज्ञानशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचा मानकरी फ्रिट्झ कॅप्राने म्हटले की, 'आता

पदार्थविज्ञानाला पुढील पाऊल टाकण्यासाठी भारताच्या वेदान्ताकडे वळावे लागेल.' मूळ मुद्दा असा की विज्ञान दृश्याची मीमांसा करू शकते व करते पण या दृश्याचा द्रष्टा जो 'मी' त्याची मीमांसा ते करू शकत नाही व द्रष्टाच जर कळला नाही तर मानवाचे आंतरिक प्रश्न सुटण्याची शक्यता नाही. जड व चैतन्य या दोन्हींचे अस्तित्व तर सामान्यतः सर्वमान्य आहे. सर्व अस्तित्व जडच आहे व आपल्या आतील चैतन्यही त्याचीच एक निर्मिती आहे असा जडाद्वैतवाद गेल्या दीड शतकापूर्वी पर्यंत प्रचलित होता. मार्क्सचा साम्यवाद त्यावरच आधारला गेला पण वैज्ञानिक प्रगतीने हा समज खोडून काढला आणि बरेच वैज्ञानिकही आता चैतन्याद्वैतवादाकडे झुकत चालले आहेत.

मानवी अंतरंगातले आणि सर्व सृष्टीतलेही चैतन्य अधिक महत्त्वाचे असून त्याचे सखोल ज्ञान विज्ञानाच्या कक्षेत शक्य नाही. 'संगणक बुद्धिबळ खेळू शकतो पण ही बुद्धी त्यात भरायला मात्र माणूसच आवश्यक आहे' असे थोर वैज्ञानिक ने म्हटले. याचे इंगितच हे की सृष्टीतील सर्व पदार्थांपेक्षा 'माणूस' महत्त्वाचा आहे. यासाठीच महाभारतकारांनी म्हटले, **'न मानुषात् श्रेष्ठतरं हि किंचित्'** म्हणजे माणसापेक्षा अधिक श्रेष्ठ काहीच नाही. सौंदर्य, प्रेम, नैतिकता, कृतज्ञता या मानवी भावनांचे अपार मूल्य असून या सर्व बाबी चैतन्याशी निगडित आहेत, जड यंत्रांशी नाही. या उदात्त भावनांच्या आविष्कार व संपोषणावर संस्कृती व मानवी सुखही अवलंबून आहे. याच्या अभावी जीवन यंत्रवत् व भकास होईल.

विज्ञानाच्या प्रगतीचा व तर्कनिष्ठ बुद्धिवादाचा धाक अनेक धर्म-संप्रदायांना पडावा हे स्वाभाविक आहे. केवळ रूढ परंपरा व कल्पना वलयांनी वेढलेल्या जुन्या ग्रंथांवरच उभे असलेल्या धर्म संप्रदायाचा पाया विज्ञानाने डळमळीत केला आहे हे सत्य आहे पण प्रायोगिक अनुभव आणि तत्त्वज्ञानावर आधारलेल्या योग-वेदान्तदर्शनांचा पाया लाभलेली वैदिक विचारधारा या विज्ञानयुगात अधिक सतेज होत आहे हे लक्षात येऊन आपणांस आपल्या ऋषि-मुनींबद्दलचा कृतज्ञता भाव दाटून यायला हवा. अद्वैत वेदान्त विचार आजच्या विज्ञानापेक्षाही अधिक प्रगत आहे.

न्यूटन नंतर विज्ञान विचार कितीतरी बदलत गेला आणि शेवटी पर्यंत आला आणि पुढे सर्वच काही अनित्य सिद्ध झाले. आधी सत्य वाटत होते ते बदलले. मग सत्य वाटत होती, तेही बदलले. - सर्व असत्य ठरत गेले. आइन्स्टाइनने सर्व सापेक्ष ठरवून टाकली. या सर्व असत्य दृश्यामागे अपरिवर्तनीय सत्य काय आहे याबाबात वैज्ञानिकच गोंधळलेले आहेत आणि यथाक्रम त्यांना अद्वैत वेदान्तविचार स्वीकारण्यास पर्याय राहणार नाही. आजही त्यातील विचारकांना हे जाणवते आहे. पण ते वैज्ञानिक प्रमाणांनी सिद्ध कसे करावे हा प्रश्न आहे. एका वाक्यात सांगायचे तर विज्ञान 'नेति नेति ...' या वेदान्तविचारापर्यंत तर पोचलेच आहे. जगन्मिथ्या, विज्ञानानेच ठरवून टाकले आहे. 'ब्रह्म सत्यम्' कळण्यासाठी आता योग-वेदान्ताकडे वळण्याखेरीज पर्याय नाही.

सर्व धर्मांचा समन्वय व्हावा व विश्वशांती साकारावी असे विचार प्रवाह वाहत आहेत. या स्तुत्य प्रयत्नाला अद्वैत वेदान्तविचारच सर्वात मोठा आधार ठरू शकतो. देश, धर्म, संप्रदाय, वर्ण, वंश, जाती, रंग, वेष, रीतिरिवाज या वैविध्यातही एक परमात्मतत्त्वाचे दर्शन घ्यायला शिकविणारा वेदान्त विचार हाच विश्वबंधुत्वाचा खरा पाया ठरू शकतो आणि हे अद्वैत तर्कनिष्ठेवर घासून घ्यायचे असेल तेव्हा ब्रह्मसूत्र शांकरभाष्याचा आश्रयही अनिवार्य ठरतो. भारतीय ऋषींचे म्हणणे हे की सर्व चराचर सृष्टीच चैतन्यमय आहे. '**सर्वं खलु इदं ब्रह्म**'. हे एकरस एकच चैतन्य नाना विविध रूपांनी आपल्या अनुभवास येते. पण हे नानात्व केवळ भासमान व परिवर्तनीय म्हणजेच मिथ्या आहे. '**न इह नाना अस्ति किंचन**'. खरे तर सर्व काही एक सत्-चित्-आनंदाचा सागरच होय. हा आचार्यांच्या '**ब्रह्म सत्य जगन्मिथ्या**' या विधानाचा खरा अर्थ होय. शरीरसुखामागे धावून शेवटी दमलेल्या हताश जीवांना जेव्हा आत्मानंदाची खरी भूक लागेल तेव्हा त्यांना भारतीय अध्यात्मशास्त्राखेरीज सुदृढ आधार नाही. अध्यात्मशास्त्राच्या बौद्धिक जिज्ञासेचे शमन करण्यासाठी वेदान्तापरता उपाय नाही व वेदान्तातील सर्व शंकांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी शांकरभाष्यासारखा ग्रंथ नाही. भोगांच्या गटारात लोळण्यातच समाधान मानणाऱ्या बिचाऱ्या पामरांसाठी नसेल पण अलौकिक रत्ने शोधणाऱ्या अभिजात मानवांसाठी असे ग्रंथ अमूल्य ऐश्वर्य ठरतात.

आचार्यांचे भाष्य संस्कृत गद्य लालित्याचे उत्तम उदाहरण असून त्याचे केवळ वाचनही मनाला प्रसन्न करते. पण त्यांच्या धारदार तर्क प्रहारातून विषयात जितके खोल जावे तितके डोके जणू गरगरू लागावे इतके ते विवेचन सूक्ष्म आहे. संक्षेप शारीरककार सर्वज्ञात्ममुनी यांनी हा, गद्यातही इतका कठीण वाटणारा विषय नितांत रमणीय आणि गेय संस्कृत श्लोकांमध्ये गुंफणे याला संस्कृत साहित्यातही तोड नाही. काव्य ग्रंथांची रसाळता कळते, शास्त्रीय ग्रंथांची तर्ककर्कशताही कळते पण या दोन परस्परविरोधी गोष्टींचे एकात्म सम्मीलन संक्षेप शारीरकातच बघायला मिळते. खरे तर या अर्थाने हा ग्रंथ अद्वितीयच होय! पंचदशी किंवा नैष्कर्म्यसिद्धीसारखे ग्रंथ किंवा आचार्यांचेही काही ग्रंथ वेदान्ताचे श्लोकबद्ध प्रतिपादन करतात खरे पण त्यातल्या कुठल्याही ग्रंथाची शारीरकातील भाष्याशी आहे तशी पांक्त बांधिलकी नाही. त्यामुळे त्यात सौकर्य आहे. सर्वज्ञात्ममुनींच्या या अजोड कृतीला व त्याचे सार संगृहीत करून देणाऱ्या स्वामींच्या टीकेला तर अभिवादन करायलाच हवे पण हे सारे विचारधन अहोरात्र अध्ययन, चिंतन व लेखन करून मराठी भाषिकांसाठी उपलब्ध करून देणाऱ्या आदरणीय डॉक्टर काकांचेही अभिनंदन करावे तितके थोडेच होय! इतक्या कठीण विषयाचे स्पष्टीकरण करतांना मातेची ममता, गुरूची प्रगल्भता व शिक्षकाचा काटेकोरपणा या सर्व भूमिकांतून त्यांची भाषा अत्यंत प्रवाही व प्रभावी झालेली दिसते. सहज ओघात आलेली त्यांची काही सुंदर वाक्ये बघा -

* कर्माने साधण्यासारख्या धर्माचा विचार जैमिनी सांगतात. महर्षी व्यास नित्यसिद्ध आत्म्याचा विचार सांगतात. (पृ. २८)

* शौच, श्रवण इत्यादि प्रवृत्तीपर कर्मे असली तरी ती आत्मज्ञानाला साह्य करतात. (पृ. ३७)

* संसारातील बहुविध दुःखांनी अनेक लोक गांजलेले असतात पण निष्काम कर्म व उपासना केलेल्यांनाच आत्मजिज्ञासा जागी होते. (पृ. ४०)

* सर्व कर्मांचे निवर्तन व रागद्वेषांचे मूळ नष्ट करून मोक्षलाभ देणे हे ब्रह्मज्ञानाने होते. (पृ. ११६)

* जेवढी निर्गुणवाक्ये निर्गुण सांगतात तेवढीच सगुणवाक्येही निर्गुण सांगतात हे रहस्य अवश्य जाणावे. त्यांच्यात पूर्ण समन्वय आहे. (पृ.१५८)

* मांडुक्यकारिकेतील अस्पर्शयोग व्यतिरेकी असून 'वासुदेवयोग' अन्वयाचा आहे. (पृ.२१३)

* ब्रह्म बिंबरूप व अनेक जीव प्रतिबिंबरूप आहेत. त्यांच्या आश्रयाने सर्व प्रपंचाची उत्पत्ती करणारे एकच अज्ञान अनेक व्यक्तींत एका जातीप्रमाणे राहते. (पृ. २२८)

* ब्रह्माच्या आश्रयाने राहणारे अज्ञान ही त्याची उपाधी असून विशेषण नाही. ब्रह्मव्यापी अज्ञान ज्ञानरूप ब्रह्मात मानणे शक्य नाही. (पृ. २३५)

या वयातही इतके कार्यमग्न आणि सावधान राहून ते ज्या प्रकारे साधकांची झोळी भरत आहेत ते बघून उत्कटपणे असे जाणवते की ते वेदान्त विषयाचे केवळ लेखन करीत नसून वेदान्त जगून दाखवीत आहेत. त्यांची ही वाणी आणि लेखणी अखंडपणे चालत राहो आणि सर्व जीवन उजळून टाकणारा वेदान्ताचा प्रकाश अधिकाधिक साधकांपर्यंत पोहोचून सर्वांचेच मानव जीवन कृतार्थ होवो अशी भगवान ज्ञानेश्वर माउलींच्या चरणी प्रार्थना! चला! दसऱ्याच्या शुभ मुहूर्तावर आत्मज्ञानाच्या राजमार्गावर दमदारपणे पुढचे पाऊल टाकू या ... इति।

धर्मश्री, पुणे<br>
विजयादशमी<br>
दि. २२/१०/२०१५

श्री ज्ञानेश्वर पदाश्रित<br>
स्वामी गोविंददेवगिरिः